# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक ०२ मार्च, २०२१ / माघ ४, १९४२ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(३)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(४)** | **नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

### बेस्ट उपक्रमाची विकासकांकडे असलेली थकबाकी वसूल करण्याबाबत

**(१) * २०९८१ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक तोट्यात असलेल्या बेस्ट उपक्रमाची विकासकांकडे एकूण ३२० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकी वसूल करण्याकडे बेस्ट उपक्रमाचे मागील १२ ते १३ वर्ष दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतकी वर्ष होऊनही सदरहू थकबाकी वसुल न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर थकबाकी वसुल करून बेस्टला आर्थिक तोट्यातून बाहेर काढण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बेस्ट उपक्रमाची विकासकांकडे एकूण रु. १६०.०९ कोटी इतकी थकबाकी असल्याचे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.
(२) बेस्ट उपक्रमामार्फत विकासकांकडून आतापर्यंत रु. ५२९.६८ कोटी इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी वैधानिक परवानग्या मिळवण्याकरिता झालेल्या उशीरामुळे कामाच्या पूर्ततेकरीता विलंब झाला आहे. त्यामुळे व्याजदराच्या अनुषंगाने येणे असणाऱ्या रकमांबाबत व मुख्यत: दंडाच्या रकमांबाबत विकासकांचे बेस्ट उपक्रमाशी मतभेद आहेत.

तथापि सदर वसुली करण्यासाठी करारातील अटी व शर्तीनुसार सामोपचाराने/लवादामार्फत प्रकरणे निकाली काढण्याकरीता प्रयत्न करण्यात येत असल्याचे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महागांव ते फुलसावंगी (जि.यवतमाळ) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२) *२३०५२ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय रस्ते विकास निधीमधून महागांव ते फुलसावंगी (जि.यवतमाळ) या राज्य महामार्ग क्र. ५१ वर १४ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम मंजुर करुन त्यासाठी २९ कोटी ८२ लाख ६८ हजार ३८६ रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण केल्यानंतर या रस्त्याचे रोड टॉप लेवल व पुलाचे टॉप लेवलमध्ये ३ ते ४ फुटाचे अंतर असून सदर बाब तांत्रिकदृष्टया १०० टक्के चुकीची झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांचे रुंदीकरणाचे काम करताना बांधकाम साहित्याचे थरावर-थर न टाकता ०.६५ मिटर खोलीमध्ये एकदाच टाकले असून बांधकामाच्या मापदंडानुसार त्याचे काम केले नसल्यामुळे सदर रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्यावरील फुलसावंगी गावामध्ये चौपदरी रस्ता तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये लाईन लेवल नसल्याने सदर रस्ता तीन महिन्यातच क्षतिग्रस्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे. हे काम केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अर्थसंकल्पात समाविष्ट झाल्यापासून, या कामावर दि.०९.०२.२०२१ पर्यंत रु. १७.७८ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. या कामाची निविदा किंमत रु.२९,८२,६८,३८६/- आहे.
(२) हे खरे नाही,

सदर कामामध्ये ११ स्लॅब ड्रेन व १ लहान पुल एवढे Structure बांधुन झालेले आहेत. सदरील Structure ची बांधणी करण्याआधी रस्त्याच्या Existing level घेण्यात आलेल्या आहेत. तसेच खोदकामानंतर पुर्ण खोली व रस्त्यावर प्रस्तावित असलेल्या वेगवेगळया थरांचा विचार करुन Slab Top level ठरविण्यात आलेली आहे. सद्यस्थितीला जरी RTL व STL मध्ये काहीशी तफावत दिसत असेल, ती Approaches वरील Treatment चे काम पुर्ण झाल्यावर दिसणार नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांनी रस्त्याच्या गुणवत्तेबाबत तपासणी केली असून, निरिक्षण अहवाल (OM) निर्गमित केले आहेत. सदर निरिक्षण अहवालातील काही मुद्यांची पुर्तता करण्यात आली असून, उर्वरित मुद्यांच्या पुर्ततेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) नगरपरिषदेमध्ये मान्सूनपूर्व कामात झालेला गैरव्यवहार

**(३) * २३१५८ डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) नगरपरिषदेमध्ये बांधकाम अभियंता आणि कंत्राटदार यांनी संगनमत करून मान्सून पूर्व कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार नगरसेवक श्री.लक्ष्मण पठाडे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली असून सदर मान्सून पूर्व कामाची चौकशी जिल्हा प्रशासनाने स्थळ पाहणी करून करण्याची मागणी नगरसेवक श्री.पठाडे यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेच्या मालकीची जागा नसतांना बनावट प्रमाणपत्र देऊन अंदाजपत्रक तयार करून त्या कामाला तांत्रिक मान्यता देण्यात आल्याने तत्कालीन मुख्याधिकारी आणि अभियंता यांनी शासनाची फसवणूक केल्याचा आरोप देखील त्या निवेदनातून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मान्सून पूर्व कामाकरिता अंदाजपत्रकामधे दर्शवण्यात आलेल्या नाले व नाल्या यामध्ये क्र.१-३१ पर्यंत नोंद करण्यात आली आहे परंतु अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या १,२,३,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२१,२४ आणि २५ या ठिकाणी नगरपरिषद आणि ले आउट मालक यांनी पक्क्या नालीचे बांधकाम केलेले नाही तरीदेखील त्या १४ ठिकाणी नाली बांधकाम दाखविण्यात आले असून मान्सूनपूर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करीत असतांना नगरपरिषदेजवळ स्वमालकीचे डम्पिंग यार्ड नसतांना बनावट प्रमाणपत्र अंदाजपत्रकाला जोडण्यात आले आहेत , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर्णी नगरपरिषदेने मान्सून पूर्व कामाची निविदा माहे मे-जून मध्ये काढण्याऐवजी दिनांक १० सप्टेंबर, २०१९ मध्ये काढली त्यामुळे या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असल्याने या कामाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार गैरव्यवहाराप्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरच्या दिनांक ३/१२/२०१९ रोजीच्या तक्रार स्वरुपातील निवेदनामध्ये, मान्सून पूर्व तयारी करण्याच्या अनुषंगाने निविदा काढण्यात आली, अंदाजपत्रक तयार करतांना दाखविलेले कामाचे स्थळ व प्रत्यक्ष काम केलेले स्थळ यामध्ये तफावत दिसून येते, नगरपरिषदेकडे स्वमालकीची डंपिंगयार्ड नसताना खोटे प्रमाणपत्र जोडले, अशा बाबीं नमूद करुन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची विनंती केली आहे.
(३), (४) व (५) • यासंदर्भात जिल्हाधिकारी, यवतमाळ कार्यालयाने दिनांक २७/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये, तहसिलदार आर्णी यांना चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे कळविले होते.
• तहसिलदार आर्णी यांनी या प्रकरणी संबंधितांचे म्हणणे केवळ नोंदवून दिनांक १२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना, चौकशी तांत्रिक स्वरुपाची असल्याने संबंधित तांत्रिक ज्ञान असलेल्या अधिकाऱ्याकडे चौकशी सोपविण्याचे सूचित केले होते.
• जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी, तहसिलदार आर्णी यांना तांत्रिक सल्लागाराची मदत घेऊन तातडीने त्यांनीच चौकशी पूर्ण करावी व अहवाल सादर करावा, असे दिनांक २२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील भूखंडधारकांचे भूखंड नियमितीकरणासाठीचे अनेक अर्ज नागपूर सुधार प्रन्यासकडे प्रलंबित असल्याबाबत

**(४) * २१४२२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासकडे नागपूर शहरातील भूखंडधारकांचे भूखंड नियमितीकरणासाठीचे अनेक अर्ज गत ४ वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील भूखंडधारकांचे भूखंड नियमितीकरणासाठीचे अर्ज तातडीने निकाली काढण्याबाबत कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत, तसेच भूखंड नियमितीकरणास विलंब करणाऱ्या नागपूर सुधार प्रन्यासमधील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) शासनाच्या दिनांक २७/०८/२०१९ च्या अधिसूचनेनुसार, गुंठेवारी अधिनियमानुसार प्रकरणे हाताळण्यासाठी, नागपूर महानगरपालिका प्राधिकरण घोषीत करण्यात आलेले आहे.

तत्पूर्वी, गुंठेवारी अधिनियमानुसार, ही जबाबदारी नागपूर सुधार प्रन्यासची होती. त्यानुसार, नागपूर सुधार प्रन्यासकडे प्राप्त एकूण १,९९,०६९ प्रकरणापैकी १,११,६५४ इतक्या प्रकरणात कार्यवाही पूर्ण झालेली असून, ३७५४१ इतकी प्रकरणे नाकारण्यात आलेली आहेत. ऑगस्ट, २०१९ अखेर उर्वरित प्रलंबित प्रकरणे दिनांक २७/०८/२०१९ च्या अधिसूचनेनुसार नागपूर महानगरपालिकेकडे पाठविण्यासाठी तयार होती.

त्यानुसार, नागपूर सुधार प्रन्यासकडून प्रलंबित प्रकरणापैकी आतापर्यंत नागपूर मनपाच्या मागणीनुसार ५८६५ धारिका मनपाकडे पाठविल्या असल्याचे नासुप्रने कळविले आहे.

यापैकी २४२५ भूखंडांना नियमितीकरणाचे मागणी पत्रक देण्यात आले असून, संबंधीत धारकाकडून मागणी पूर्ण झाल्यानंतर, नियमितीकरणाची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, नागपूर मनपाकडून कळविले आहे.

भूखंड नियमितीकरण अर्ज प्रलंबित राहण्यासाठी मुख्यत्वे खालील कारणे आहेत. :- १) अभिन्यास मंजूर/नियमित नसणे २) भूखंडाचे आरक्षण ३) न्यायप्रविष्ठ प्रकरणे ४) मालकी हक्काचा वाद ५) भूखंड मौक्यावर उपलब्ध नसणे ६) भूखंडावर अर्जदाराचा ताबा नसणे ७) एकाच भूखंडाकरिता एकापेक्षा

जास्त अर्ज येणे ८) अर्जदाराकडून भूखंडाच्या नियमितीकरणासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणे ९) नियमितीकरण शुल्काचा भरणा न करणे इ. उपरोक्त वस्तुस्थिती पहाता, नागपूर सुधार प्रन्यासच्या अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडाळा (मुंबई) येथील संक्रमण शिबिरात रहिवाशांना येत असलेल्या अडचणींबाबत

**(५) * २२५०५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वसाहत धोकादायक झाली असल्याने सन २०१६ मध्ये रिकामी करून त्यामध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना वडाळा येथील संक्रमण शिबिरात तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची व्यवस्था केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संक्रमण शिबिरात येत असलेल्या अडचणींसंदर्भात कर्मचाऱ्यांनी वारंवार तक्रारी करून देखील त्यांना न्याय मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तदनुसार कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची लवकरात लवकर दुरुस्ती करण्याबाबत तसेच संक्रमण शिबीरातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कस्तुरबा रुग्णालयातील कामगारांच्या वसाहतीतील इमारत क्रमांक ५५ व ६०/बी अनुक्रमे सन २०१५ व सन २०१८ मध्ये रिक्त करुन, सदर इमारतीतील कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था ॲन्टॉप हिल वडाळा व मानखुर्द येथे करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कस्तुरबा रुग्णालयातील धोकादायक इमारत क्रमांक ५५ व ६० बी सन २०१५ व सन २०१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आल्या असून, सदर इमारतींच्या जागेवर नवीन इमारत बांधण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

तसेच, सदर संक्रमण शिबिराच्या दैनंदिन साफसफाईकरिता सफाई कामगार उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सांडपाणी, मलनि:सारण, जमा कचऱ्याबाबतच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिडेवाडा (पुणे) येथील मुलींच्या पहिल्या ऐतिहासिक शाळेची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) * २२२८९ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिडेवाडा ,बुधवारपेठ (पुणे) या दुमजली वाड्यात दिनांक १ जानेवारी,१८४८ रोजी वा त्या सुमारास भारतातील पहिली स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्त्रियांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पेरणाऱ्या व स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी ज्या भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली ती ऐतिहासिक वास्तू शासनाने ताब्यात घेवून राष्ट्रीय स्मारक करण्याचा ठराव दिनांक २१/०२/२००६ रोजी पुणे महानगरपालिकेने केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पुणे महानगरपालिकेने दिनांक ०५/०६/२००८ रोजी वा त्या सुमारास भुसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याकरिता मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली याचिका तात्काळ निकाली काढण्याच्यादृष्टीने शासनाने अद्यापपर्यंत आपली बाजू मांडण्यासाठी तज्ज्ञ वकिलांची नेमणूकच केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दि. १७/१२/२०२० आणि दिनांक ०३/०१/२०२१ रोजी वा त्यापूर्वी अनेकवेळा निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) • या प्रकरणी पुणे महानगरपालिकेने दिनांक ०५.०६.२००८ रोजी भू-संपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविला आहे. तथापि, सदर वास्तुतील भाडेकरू / मालक यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३०९०/२०१० व ३५१९/२०१० दाखल केलेले असून या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे भू-संपादनाची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.

• मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली होण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाची बाजू मांडण्यासाठी राज्याच्या विधि व न्याय विभागामार्फत दि.२९.०७.२०२० च्या पत्रान्वये महाअधिवक्ता, मा.उच्च न्यायालय यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) या प्रकरणी शासनाकडे वेळोवेळी विविध स्तरावरून निवेदने प्राप्त झालेली असून, सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विशेष उल्लेखाव्दारे सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्या संदर्भात सन्माननीय जनप्रतिनिधींना प्रकरणाची वस्तुस्थिती दि.०१.१२.२०२० च्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे.

(६) • या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेले भाडेकरू/मालक यांच्यासोबत चर्चा करून सर्व मान्य तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, पुणे तसेच पुणे महानगरपालिका, संचालक, पुरातत्व विभाग

यांचेकडून एकत्रितपणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

- भिडेवाडा ही ऐतिहासिक वास्तू ताब्यात घेवून राष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे, पुणे महानगरपालिका, तसेच शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.
- भू-संपादनाची कार्यवाही पूर्ण होवून सदर वास्तु ताब्यात आल्यावर शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून तेथे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येणार आहे.

-----------------

## जोगेश्वरी (मुंबई) येथील पादचारी पुलाच्या कामाबाबत

**(७) * २३७७७ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) रेल्वे स्थानक परिसरातील रेल्वे फाटक येथे पादचारी पुल बांधून सदरहू पादचारी पूल जोगेश्वरी पूर्वेला इस्माईल युसुफ महाविद्यालय पर्यंत तर जोगेश्वरी पश्चिमेला मलकाम बाग पर्यंत बांधण्याचे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पादचारी पुलाच्या बांधकामाबाबत रेल्वेच्या हद्दीतील पुलाचे बांधकाम व जोगेश्वरी पूर्वेकडील इस्माईल युसुफ महाविद्यालया पर्यंतच्या पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून ईस्माईल युसुफ महाविद्यालयाकडील पुलाच्या बाजुस स्वयंचलित पायऱ्या बसविण्याचे काम अद्याप प्रलंबित असून सदरहू काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदरहू पादचारी पूल हा जोगेश्वरी पश्चिमेला मलकाम बाग पर्यंत करण्याचे प्रस्तावित असताना तो केवळ जोगेश्वरी बस डेपोपर्यंत बांधण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरह पादचारी पूल हा मलकाम बाग पर्यंत न बांधण्याची कारणे काय आहेत व प्रस्तावित केल्यानुसार सदरहू पादचारी पूल मलकाम बागपर्यंत बांधण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, सदरहू पादचारी पुलाचे काम हे गत ९ वर्षांपासून प्रलंबित असल्याने या प्रकल्पाच्या किंमतीत सातत्याने वाढ झाल्याने शासनाचे नुकसान होत असून सदर विलंबास जबाबदार असणारे दोषी अधिकारी व कंत्राटदार यांचेवर शासन कोणती कारवाई करणार असून किती कालावधीत करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) जोगेश्वरी पूर्वेकडील इस्माईल युसुफ महाविद्यालय पर्यंतच्या पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून, त्याठिकाणी स्वयंचलित पायऱ्या बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर काम माहे एप्रिल २०२१ पर्यत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) जोगेश्वरी पश्चिमेकडील एस.व्ही. रोडवरील मलकाम बाग लगतच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याने जिना उतरवणे शक्य होत नाही. त्यामुळे सदर पादचारी पूल बस डेपो समोरील रस्त्याच्या पदपथावर उतरविण्यात येत आहे.
(५) व (६) सदर कामाचा कार्यादेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये देण्यात आला होता.

तथापि भूमिगत सेवा, विद्युत वाहिन्या, अरुंद रस्ता, बांधकामे स्थलांतरीत करणे, कोरोना प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे सदर प्रकल्पाच्या कामास विलंब झाला असला तरी सदर प्रकल्पाच्या किंमतीत कोणतीही वाढ झालेली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## मुंबईतल्या म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील रहिवाशांना म्हाडाने २० वर्षापासूनचे थकीत वाढीव सेवा शुल्क भरण्याच्या पाठविलेल्या नोटीसांबाबत

**(८) * २०४१८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतल्या म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील रहिवाशांना म्हाडाने २० वर्षापासूनचे थकीत वाढीव सेवा शुल्क भरण्याच्या नोटीसा पाठविल्यानंतर उक्त वाढीव शुल्कात सवलत मिळावी अशी मागणी वसाहतीमधील रहिवाशांनी वारंवार निवेदने देऊन शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने बृहन्मुंबईमधील म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील गृहनिर्माण संस्थांकडील थकीत सेवाशुल्कासंदर्भात तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशींनुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, वाढीव सेवा शुल्काबाबत सन २००३ मध्ये स्थगिती दिलेली असतांनाही म्हाडाने १९९८ पासूनचे सेवाशुल्क थकबाकीसह भरण्याच्या नोटीसा म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील रहिवाशांना विशेषतः नेहरू नगर, टिळकनगर, सहकार नगर, अभ्युदयनगर, काळाचौकी येथील रहिवाशांना देऊन थकबाकी भरण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म्हाडा वसाहतीतील रहिवाशांच्या अतिरिक्त वाढीव शुल्काच्या तक्रारीची दखल घेऊन समितीने सुचविलेल्या अभय योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे आहे.

(२) तत्कालीन मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशींनुसार प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही.

(३) हे खरे आहे.

सन २०१८ मध्ये सुधारीत सेवा शुल्क वसुलीबाबत नोटीसा जारी करण्यात आल्या होत्या.

(४) व (५) सदरहू विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि.१६/१२/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली आहे. सदर बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी म्हाडा वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्था / रहिवाशांकडील थकीत सेवाशुल्काबाबतच्या प्रलंबित प्रश्नांवर उपाय योजना सुचविण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीच्या शिफारशींनुसार मुंबई मंडळांतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था / रहिवाश्यांकडून वसुल करावयाच्या थकीत सेवाशुल्क / सुधारीत सेवाशुल्क याबाबत अभय योजना तयार करुन तसा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले आहेत. तसा प्रस्ताव म्हाडाकडून दि.१७/०२/२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून त्यावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांसाठी मालकी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या घरांबाबत

**(९) * २२८५८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांसाठी मालकी तत्वावर उभारण्यात येणारी घरे मालकी तत्वावर देण्याचा महानगरपालिकेचा कोणताही विचार नसल्याचे नगरविकास विभागाने कळविले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन परिपत्रक क्रमांक सकाका-२०१५/सं.क्र.४२/नवि-३४/ दि. १२.०६.२०१५ नुसार मुंबईतील सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असताना संबंधित विभागाकडून सदर दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांना लवकरात लवकर मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी आश्रय योजनेंतर्गत सेवासदनिका देण्यात येतात. तथापि त्यांना मालकी हक्काची घरे देण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कोणताही विचार नाही असे सन २०२० च्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक ५२०२ च्या अनुषंगाने कळविण्यात आले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागात एकूण २९,८१६ कायम सफाई कामगार असून सध्या असलेल्या सफाई कामगारांच्या वसाहतीच्या भूखंडावर आश्रय योजनेंतर्गत १४,००० घरे बांधण्याबाबतची महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरित १५,८१६ सेवासदनिकांसाठी भूखंडाची कमतरता असल्यामुळे, सेवासदनिका बांधणे शक्य होत नाही. यामुळे शासन परिपत्रक दिनांक १२.०६.२०१५ नुसार ५०% सदनिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत सदनिका उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेच्या तुर्तास विचाराधीन नाही.

शासन परिपत्रकानुसार सदर योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता शासनाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस भुखंड उपलब्ध करुन दिल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना राबविणे सुलभ होईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहीम (मुंबई) येथील म्हाडाने संपादित केलेल्या इमारती व चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(१०) * २०६०७ श्री.सदा सरवणकर (माहिम)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम (मुंबई) येथील पटेल इमारत, मोहम्मदी इमारत, गुलाम रसूल चाळ, बोरी चाळ, कांदेवाला चाळ यांचा पुनर्विकास करण्यासाठी या चाळी व इमारतीं म्हाडाने संपादित केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे तीस वर्षाचा कालावधी होऊनही पुनर्विकास न झाल्याने सद्य:स्थितीत या इमारती अत्यंत धोकादायक बनल्या असून येथील रहिवाशी जीव मुठीत घेऊन या ठिकाणी वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदरहू धोकादायक इमारतींची दुरुस्ती अथवा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे अंशत: खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अहवालानुसार पटेल इमारत वगळता इतर मोहम्मदी इमारत, गुलाम रसुल चाळ, बोरी चाळ व कांदेवाला चाळ या इमारती म्हाडाने संपादित केलेल्या आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून पटेल इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु असून मोहम्मदी इमारतीची दुरुस्ती करण्यात आली आहे. गुलाम रसुल चाळ पुर्णत: खाली करुन घेण्यात आली असून सदर इमारत पाडण्यात आली असून त्याजागी सद्य:स्थितीत मोकळा भुखंड आहे. बोरी चाळ व कांदेवाला चाळ इमारत पाडण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे चेंबूर (मुंबई) येथील न.भू.क्र. १२६/१ आणि १२६/२ हे भूखंड ईई २.१ (महाविद्यालय) आणि आरओएस १०४ (क्रिडांगण) करिता आरक्षित असलेल्या भूखंडांबाबत

**(११) * २१३२५ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचा प्रारुप विकास आराखडा सन २०३४ व प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (२०३४) ला महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचना क्र.टीबीपी/ ४३४७/ ६२९/ सीआर-११८/२०१७/डीपी/नवि-११ दि.८.५.२०१८ अन्वये मंजूरी मिळाली असून सदर मंजूर विकास आराखड्यामध्ये मौजे चेंबूर येथील न.भू.क्र. १२६/१ आणि १२६/२ हे भूखंड ईई २.१ (महाविद्यालय) आणि आरओएस १०४ (क्रिडांगण) करिता आरक्षित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत सदरहू भूखंडावर राहूल नं.२ पाईपलाईन महात्मा जोतिबा फुले को.ऑ.हौ. सोसायटी असून या झोपडपट्टीच्या पुनर्विकासाकरिता सीटीएस क्र.१२६ -/१ चुनाभट्टी येथील खेळाचे आरक्षण उठविण्याबाबत किंवा आरक्षित असलेल्या जागेपैकी ४० टक्के जागा पुनर्विकास योजनेकरिता मिळण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करुन १४ वर्षांचा कालावधी झाला असूनही अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या संदर्भात अद्यापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत, तसेच उक्त प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे : (**१) होय, हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासनाने दि. ८/०५/२०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना-२०३४ सह प्रारुप विकास नियंत्रण व

प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ईपी) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे.

मौजे चेंबूर येथील न.भू.क्र. १२६/१ आणि १२६/२ हया भूभागाचा उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये ईपी-एल १४ मध्ये समावेश असून सदर भूभागावर विद्यमान महाविद्यालय व क्रिडांगणाचे निर्देशन दर्शविण्यात आले असून सदर भूभागाची हद्द नगर भूमापन नकाशानुसार दुरुस्ती दर्शविण्यात आली आहे. सदर ईपी ला शासनाने अंतिम मंजूरी देणे बाकी आहे.

(२) व (३) वरील उपप्रश्न (१) मध्ये नमूद केल्यानुसार शासन नगर विकास विभागाने दि. ८/०५/२०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे मंजूर केलेली बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली असून त्यानुसार त्यापूर्वी अंमलात असलेली विकास योजना, १९९१ चा अंमल संपुष्टात आला आहे. सबब, सदरहु भूभागावर १९९१ चे विकास योजनेतील आरक्षण वगळण्याबाबत १५ वर्षांपूर्वी प्रस्ताव सादर केला असला तरी विकास योजना, १९९१ आज रोजी अंमलात नसल्याने सदर विकास योजनेतील आरक्षण वगळणेबाबतचे प्रस्तावावर आता कार्यवाही करणे अभिप्रेत नाही.

(४) अशी बाब नाही.

-----------------

## नागपूर येथे कचरा वाहतुक करणाऱ्या एजन्सीने कचऱ्यामध्ये माती मिसळून केलेला गैरव्यवहार

**(१२) * २१५६२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका अंतर्गत कचरा संकलन करणाऱ्या ए.जी. एनवायरो कंपनीच्या ३ मोठ्या वाहनांमधील कचऱ्यामध्ये माती मिश्रीत कचरा असल्याचे दिनांक २८/०६/२०२० रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी टाकलेल्या छाप्यामध्ये निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचे एक सदस्य समितीच्या दिनांक १०/०७/२०२० रोजीचे अहवालानुसार माती मिश्रीत कचऱ्याची ६० वाहने आढळून आल्याने गैरव्यवहार झाल्याचे कबुल करुन ए.जी. एनवायरो कंपनीला रु. २५.०० लक्ष चा दंड करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी सविस्तर चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार अहवाल सादर करण्यात आला आहे काय, अहवालानूसार दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) महापालिकेकडून करण्यात आलेल्या चौकशीअंती, कचरा वाहतूक एजन्सीच्या जवळपास ६० वाहनामध्ये माती मिश्रीत कचरा वाहतुक केल्याचे दिसून आल्यामुळे, कंत्राटदारास द्यावयाच्या जून, २०२० च्या मासिक देयकातून, रु.२७,११,१०३/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

तसेच मातीमिश्रीत कचरा आढळून आल्यानंतर, त्या वाहनाचे संगणीकृत काट्यावर घेण्यात आलेले वजन वगळण्यात आलेले आहे.

(३) व (४) शासनास अहवाल सादर केला असून, चौकशी अहवालानुसार, कंपनीवर करारातील अटी व शर्तीनुसार, दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या परिवहन समितीसभेमध्ये मंजूर करण्यात आलेला ठराव क्र. १९ विखंडीत करण्याबाबत

**(१३) * २२११३ श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या परिवहन समितीने माहे डिसेंबर २०२० पासून बसचालक, बसवाहक, प्रवर्तक, लिपिक व तिकीट तपासनीस आदी कामांकरीता तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या करण्याबाबतचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या परिवहन सभेमध्ये ठराव क्र. १९ अन्वये सर्वानुमते पारीत करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे स्वरुप हे मासिक सरासरी २ लाख रूपयांपेक्षा अधिक खर्चाच्या स्वरूपाचे असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि “ड” प्रकरण ५ (२) (१) अन्वये निविदा मागविणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने संविदा करण्यापूर्वी निदान ७ दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे नोटीस देऊन अशा निविदा मागविणे अपेक्षित होते, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, महानगरपालिकेने या प्रकरणी कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करताच तसेच निविदा न मागविताच में.एनपीएस फॅसिलिटी व में.महालक्ष्मी कृपा इन्फ्रा प्रा.लि. यांचे प्रस्ताव मंजूर केले, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, सदरच्या प्रस्तावा संबंधित कोणतीही जाहिरात वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली नसून देखभाल व दुरुस्ती या कामी मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रा प्रा.लि. यांचा प्रस्ताव परिवहन व्यवस्थापकाकडे आलेला नाही, हे खरे आहे काय ,

(५) असल्यास, सदर प्रकरणी ठरावातील नमूद माहिती असत्य आणि दिशाभूल करणारी असून परिवहन व्यवस्थापक व परिवहन समिती यांनी संगनमत करून त्यांची कृती विशिष्ट कंत्राटदाराच्या हिताची जपणूक करणारी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि अंमलात असलेल्या कायद्याच्या मर्यादे बाहेर आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरचा मंजूर ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि “ड” प्रकरण ५ (२) (२) चा चुकीच्या पध्दतीने वापर करून महानगरपालिकेच्या निधीचा दुरुपयोग, अपव्यय व गैरवापर होण्याचा संभव असल्याने सदरचा ठराव विखंडीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री नगरविकास विभाग यांच्याकडे माहे जानेवारी २०२१ मध्ये वा त्या दरम्यान पत्राव्दारे मागणी केली, हे ही खरे आहे काय ,

(७) असल्यास, सदरचा ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमन कलम ४५१ अन्वये विखंडीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) • अशा नियुक्त्या करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव माहे जानेवारी २०२१ वा त्या दरम्यान परिवहन सभेमध्ये पारीत करण्यात आलेला नाही.

(२), (३), (४) व (५) • मे. भागीरथी एमबीएमटी प्रा. लि. यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेतील आदेश होईपर्यंत त्यांचेकडून बससेवा सुरू ठेवण्याबाबतचा ठराव क्र. १८, दि. १५.१२.२०२० परिवहन समितीने मंजूर केला होता.

• दि. १८.१२.२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सदर प्रकरणी सुनावणी झाली असून मा. न्यायालयाने मान्य केल्यानुसार पुढील व्यवस्था होईपर्यंत महानगरपालिकेने तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी घेऊन जनहितार्थ दि. १८.१२.२०२० पासून बससेवा सुरू ठेवली.

• दरम्यान महानगरपालिकेने बस ऑपरेटर नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली. निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा प्रा. लि. यांचा पुर्वानुभव विचारात घेऊन त्यांची पुर्वीच्या बस ऑपरेटरच्या मंजूर दराने NCC with VGF तत्वावर परिवहन समितीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची “ड” प्रकरण ५(२) (२) नुसार असलेल्या अधिकारात नियुक्ती केली आहे.

(६) व (७) • अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधीचे पत्र शासनास प्राप्त झाले, हे खरे आहे.

• यासंदर्भात आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा अहवाल प्राप्त झाला असून बस ऑपरेटरच्या नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या व्यवस्थेसाठी परिवहन समितीने त्यांचे अधिकारात मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा प्रा. लि. यांची केलेली नियुक्ती नियमानुसार असल्याचे, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

-----------------

## चांदिवली (मुंबई) कुर्ला प्रिमिअर कंपनीच्या जागेवर एच.डी.एल या कंपनीतर्फे सुरु असलेले रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत

**(१४) * २१५८० श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदिवली (मुंबई) कुर्ला प्रिमिअर कंपनीच्या जागेवर एच.डी.एल या कंपनीतर्फे सुरु असलेल्या बांधकामामध्ये महाराष्ट्र शासन व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार ५ टक्के सुविधेचा भूखंड (ॲमेनिटी प्लॉट) अंतर्गत रूग्णालयासाठी ४ हजार चौ मीटर जागा आरक्षित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आरक्षित जागेवर इमारत " ए " विंग ३२-३३ हजार चौ. मीटर बिल्टअप क्षेत्र रूग्णालयासाठी आर.सी.सी व वीट बांधकाम करुन ६५० खाटांकरिता १० मजली इमारत बांधून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "बी" विंग हे नर्सिंग कर्मचा-यांच्या वसतीगृहासाठी आरक्षित असून सदर इमारतीचे काम पूर्ण करुन मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करुन महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही,

(४) सदर रुग्णालयाची पाहणी करण्यात आलेली असून, कुर्ला प्रिमिअर कंपनीच्या जागेवर एच.डी.आय.एल विकासकाकडून १०% राखीव असलेल्या सुविधा भूखंडावर रुग्णालय व नर्सींग ट्रेनिंग सेंटर इमारतीचे अर्धवट स्वरुपात बांधकाम करण्यात आलेले असून सद्य:स्थितीत ह्या दोन्ही इमारती अपूर्ण अवस्थेत आहेत. मा.विधानसभा सदस्य श्री.दिलीप लांडे व मा.विधानसभा सदस्य श्री.मंगेश कुडाळकर यांनी सदर रुग्णालयाचे अर्धवट स्वरुपात असलेले काम महाराष्ट्र शासन किंवा महानगरपालिकेकडून तातडीने पूर्ण करुन रुग्णालयाच्या इमारतीचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्याबाबत विनंती केलेली होती. एच.डी.आय.एल विकासकावर एन.सी.एल.टी अंतर्गत कार्यवाही सुरु आहे. तथापि, रुग्णालयासाठी व नर्सींग ट्रेनिंग सेंटर साठी बांधण्यात आलेल्या इमारतींचे हस्तांतरण “ जशा आहेत तशा ” स्वरुपात बृहन्मुंबई महानगरपालिका करुन घेण्यास तयार असेल तर याबाबतची पुढील कार्यवाही करता येईल, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत दि.१८.११.२०२० अन्वये कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील श्रीमलंग गडावर जाण्यासाठी सुरू असलेले फ्युनिक्युलर ट्रॉलीचे काम अत्यंत संथ गतीने होत असल्याबाबत

**(१५) * २३७९८ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील श्रीमलंग गडावर जाण्यासाठी फ्युनिक्युलर ट्रॉलीचे काम सन २०१२ पासून सुरू असून अद्याप पूण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम ज्या कंपनीला देण्यात आले होते त्या कंपनीस काम पूर्ण करण्याकरिता वारंवार मुदतवाढ देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कंत्राट घेणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकून नवीन कंपनीची नियुक्ती करण्याबाबत तसेच गडावर जाण्याकरिता असलेल्या पायऱ्यांचे काम देखील वन विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे पूर्ण होऊ शकले नाही, याबाबतची सविस्तर चर्चा जिल्हा नियोजन बैठकीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) खाजगीकरणांतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामाची मुदत २१.२.२०१४ पर्यंत होती. तथापि सदर काम विहीत मुदतीत पूर्ण न झाल्याने या कामास दि.३१.१२.२०१५ पर्यंत एकदा मुदतवाढ देण्यात आली.
(३) जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत फ्युनिक्युलर ट्रॉलीच्या कामासंदर्भात चर्चा झाली आहे. गडावर जाण्याकरिता पाय-यांचे बांधकाम ही बाब फ्युनिक्युलर ट्रॉलीच्या कामामध्ये अंतर्भुत नाही.
(४) फयुनिक्युलर ट्रॉलीचा करारनामा संपुष्टात आणण्याबाबत संबंधित उद्योजकास प्राथमिक नोटीस देण्यात आली आहे. कर्ज सहाय्य करणा-या बँकेला पर्यायी सवलतकार नेमण्याच्या पर्यायाबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे हरिशचंद्री (ता. भोर, जि.पुणे) येथील ६ पदरी रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने होत असल्याबाबत

**(१६) * २२१२७ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हरिशचंद्री (ता. भोर, जि.पुणे) येथील ६ पदरी रस्त्याचे काम कंत्राटदार कंपनीकडून अत्यंत संथ गतीने सुरु असून अनेक कामे अपूर्ण असल्याने रस्त्यावर अपघात होऊन नागरीकांचा मृत्यूही होत असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधीत कंत्राटदारावर कारवाई करण्यासह या रस्त्यांशी संबधीत अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सदर राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत येते.

मौजे हरिशचंद्री (ता. भोर, जि.पुणे) येथील ६ पदरी रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील पुणे-सातारा प्रकल्पाचा भाग आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पाच्या एकूण १४०.३५० कि.मी.पैकी १३५.०२ कि.मी. लांबीचे सहापदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम स्ट्रक्चर्स व ॲप्रोचसह लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) व (३) मौजे हरिशचंद्री येथील ग्रामस्थांनी सदर रस्त्याच्या कि.मी.८०६/०३० येथे रस्ता ओलांडण्याकरिता अंडरपासची मागणी केली होती. तथापि प्रकल्पाच्या करारनाम्याअंतर्गत कि.मी.८०५/३१० या ठिकाणी अंडरपासचे बांधकाम झाले असल्याने आय.आर.सी.मानकानुसार हरिशचंद्री येथील ग्रामस्थांची मागणी पूर्ण करणे शक्य न झाल्याने ग्रामस्थांनी या ठिकाणच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या सर्व्हिस रोडचे काम करण्यामध्ये अडथळा निर्माण केला होता. तथापि सदर प्रकरणी ग्रामस्थांसोबत वारंवार झालेल्या बैठकीनंतर सदर सर्व्हिस रोडसह उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) नगरपालिकेकडून मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याबाबत

**(१७) * २३६८५ श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) नगरपालिकेचे १६ महिन्यांत पाच मुख्याधिकारी बदलल्यामुळे पाणी, रस्ते, वीज व आरोग्यविषयक कामे इत्यादी सोयीसुविधा प्रलंबित असल्याचे तसेच १८ कोटी रुपयांचा निधी पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोयीसुविधा नागरिकांना पुरविण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर ठिकाणी सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) • अक्कलकोट नगरपरिषदेमध्ये ऑगस्ट, २०१९ ते डिसेंबर, २०२० या कालावधीत ५ अधिकाऱ्यांची मुख्याधिकारी म्हणून नियमित / अतिरिक्त कार्यभार देऊन नियुक्ती करण्यात आली, ही बाब खरी आहे.

• जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिलेल्या अहवालानुसार, उपरोक्त कालावधीत नागरिकांना पाणी, रस्ते, वीज व आरोग्य विषयक सुविधा देण्यात आल्या असून याबाबत नागरिकांच्या कोणत्याही तक्रारी प्रलंबित नाहीत.

• शासनाने अक्कलकोट नगरपरिषदेस उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून २ कामे निविदा मंजूरीच्या स्तरावर, ७ कामे चालू स्थितीत आहेत. तर १ काम पूर्ण झालेले आहे. तसेच २ कामांमध्ये कंत्राटदारास आदेश देण्यात आलेले आहेत. तर २ कामे जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहेत.

• त्यामुळे नगरपरिषदेकडे कोणताही निधी पडून नाही, असे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे कॉलनी (मुंबई) येथे नियोजित असलेले मेट्रो कारशेड कांजूरमार्ग येथे स्थलांतरित करण्यात आल्याबाबत

**(१८) * २०४११ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), अ‍ॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे कॉलनी (गोरेगाव, मुंबई) येथील जागा, २०५३ पर्यंतची लोकसंख्या व रेकची (रेल्वे गाड्या) संख्या विचारात घेता पुरेशी असतानासुध्दा सदर जागा २०३१ पर्यंतच पर्याप्त असल्याने मेट्रोचे कारशेड आरे कॉलनी (गोरेगाव, मुंबई) येथून कांजूरमार्ग (मुंबई) येथे हलविण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारडेपो कांजूरमार्गला नेल्यास किमान ३ पट अधिक झाडे तोडावी लागणार असून या प्रकल्पाचा एकूण खर्च व कालावधी यामध्ये वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी शासनाने तातडीने काम सुरु करत मातीचा भराव टाकल्याने राम नगर, ट्रोली लाईन, छत्रपती नगर, हनुमान गल्ली, एकविरा नगर, पंचशील नगर, मोहता देवी या वस्त्यातून जाणाऱ्या लहान मोठ्या नाल्यातील पाण्याचा निचरा होण्याचा मार्ग बंद झाला असून त्यामुळे नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत असून नाल्यातील सांडपाणी घरात शिरत आहे व पावसाळ्यात ही परिस्थीती गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कांजूरमार्ग येथील जागा खारजमीन असून श्री.मदन समिती व श्री.मनोज सौनिक समिती यांनी सदर जागा मेट्रो कारशेडसाठी उपयुक्त नसल्याचे त्यांच्या अहवालात नमुद केलेले आहे, तसेच स्थलांतरित करण्याच्या सदर निर्णयाला मा.न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मेट्रो कारशेड सुरु करुन मेट्रो प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कोणता निर्णय घेणार असुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पाच्या मूळ सन २०१३ च्या डीपीआरमध्ये आरे कॉलनी येथील ३० हेक्टर जागेमध्ये ५५ रेल्वे गाड्यांकरिता (४४० कोचेस) कारशेड नियोजित करून सन २०३१ पर्यंत ६ कोचेसच्या रेल्वे गाड्या कार्यान्वयीत करून तदनंतर ८ कोचेस पर्यंत वाढविण्याचे नियोजित होते. सन २०१५ मधील सुधारित डीपीआरनुसार प्रकल्पाच्या डीझाईन कालावधीमध्ये सुरुवातीपासूनच ८ कोचेस च्या रेल्वे गाड्या कार्यान्वयीत करण्याचे नियोजन करण्यात आले होते. तथापी, आरे कारशेडमध्ये बाधित होणारी वृक्ष संख्या विचारात घेऊन २५ हेक्टर जागेमध्ये ८ कोचेसच्या ३९ रेल्वे गाड्यांसाठी (३१२ कोचेस) व सन २०३१ पर्यंतची वाहतूक गरजांची पुर्तता करेल असा कारशेड आराखडा नियोजित करण्यात आला. एमएमआरसीएलने सद्यस्थितीत अंदाजित केलेले प्रवासी वाहतूक अंदाज विचारात घेता, सद्यस्थितीतील आराखडा हा सन २०३१ पर्यंत ४२ रेल्वे गाड्यांचे समावेशन करू

शकेल. तद्नंतरच्या प्रवासी वाहतुक सुनियोजित करण्यासाठी अतिरिक्त ५ हेक्टर जागेची आवश्यकता भासेल ज्याकरिता सुमारे १००० पेक्षा जास्त जुने वृक्ष बाधीत होतील. उक्त बाब तसेच, मौजे कांजूरमार्ग येथील मुंबई मेट्रो मार्गिका-३, ४ व ६ यांचे एकात्मिक कारशेड तसेच मार्गिका-६ व प्रस्तावित मार्गिका-१४ च्या आंतर-बदल स्टेशन यांची सुसाध्यता व अनुषंगिक फायदे विचारात घेऊन दि.१० ऑक्टोबर २०२० रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मुंबई मेट्रो मार्गिका-३ व ६ यांचे एकत्रिकरण करुन दोन्ही मार्गांसाठी कांजूरमार्ग येथे कारशेड डेपो उभारण्याबाबत तत्वत: मान्यता दिली आहे.

(२) बाधित झाडे, प्रकल्पाचा खर्च व कालावधी यामध्ये होणाऱ्या वाढीबाबतची माहिती विस्तृत प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध होईल.

(३) कांजूरमार्ग येथे प्रस्तावित असलेल्या कारशेडच्या जागेवर डेपोच्या बांधकामाकरिता आवश्यक असलेले मनुष्यबळ, साधन/यंत्र सामग्री इत्यादिंची ने-आण करण्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात भराव टाकून कच्चा रस्ता बनविण्यात येऊन सदर भरावामुळे प्रस्तावित कारशेड लगत असलेल्या परिसरात सांडपाणी/ पावसाचे पाणी साचू नये याकरिता अंदाजित प्रत्येकी २५ मी अंतरावर सदर कच्च्या रस्तामध्ये चरी खोदून सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होईल याची खबरदारी घेण्यात आली होती.

(४), (५) व (६) मुंबई मेट्रो मार्ग-३ कारशेड संदर्भात सन २०१५ मध्ये नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने कांजूरमार्ग येथील जागा तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्य असल्याबाबत शिफारस केली होती. तथापि, सदर जागेच्या मालकी हक्कासंदर्भातील न्यायप्रविष्ट दाव्यांच्या पार्श्वभूमीवर कांजूरमार्ग येथील जागा उपलब्ध न झाल्यास आरे कॉलनी येथील पर्याय देखील सुचविला होता.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी त्यांच्या दि. १ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या आदेशान्वये मौजे कांजुरमार्ग, ता. कुर्ला येथील जमिनीचा आगाऊ ताबा मेट्रो कारशेड व अनुषंगिक प्रयोजनार्थ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिला होता. दरम्यान, कांजुरमार्ग येथील जमीनीसंबंधी मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १६ डिसेंबर २०२० रोजीच्या अंतरीम आदेशाद्वारे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांच्या उक्त आदेशाच्या अंमलबजावणीस व सदर जमिनीवर सुरु असलेल्या कामास स्थगिती दिली आहे.

मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या कारशेडकरिता पर्यायी जागा निश्चित करण्यासंबंधी राज्य शासनास शिफारस करण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला असून सद्यस्थितीत अहवाल तपासण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत कारशेड संबंधित कामे वगळता उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

-----------------

## नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) अंतर्गत घरकुलांचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * २०३८४ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) अंतर्गत सन २०१९-२० मध्ये नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी, मौदा, कामठी, हिंगणा, नागपूर (ग्रामीण), सावनेर व कळमेश्वर या तालुक्यात घरकुल मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका वर्षापेक्षा जास्त कालावधी पूर्ण होवूनही घरकुलाचे बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकामास निधी उपलब्ध करून देण्यास व घरकुलाचे प्रलंबित असलेले बांधकाम सुरू करण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत पारशिवनी, मौदा, कामठी, हिंगणा, नागपूर (ग्रामीण), सावनेर व कळमेश्वर या तालुक्यातील नागरी क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १९९२५ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मंजुरी दिली आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत उपरोक्त घरकुलांसाठी राज्य हिश्श्याचा रु. ५४२७.८० लक्ष आणि केंद्र हिश्श्याचा रु. ९३३.६० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र. ४ BLC पात्र लाभार्थ्यांना राज्य हिश्श्याचा निधी रु. १ लाख महाराष्ट्र निवारा निधीतून सरसकट वितरित करण्याबाबत दि.०१.०८.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, केंद्र हिश्श्याच्या निधीबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यामधील समृध्दी महामार्गाच्या कामामुळे रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(२०) * २३६६७ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यामधील ३६ कि.मी. च्या समृध्दी महामार्गाचे काम ॲपको कंपनीकडून सुरू असून या कामामुळे रस्त्यालगतच्या शेतात मोठ्या प्रमाणात धूळ साचत असून शेतक-यांच्या शेतमालाचे नुकसान होत असल्याने संतप्त शेतक-यांनी हातात कु-हाड घेऊन रस्त्यांचे काम माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान बंद पाडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कंत्राटदार आवश्यक ती उपाययोजना करीत नसल्याने संबंधित शेतक-यांच्या शेत पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणी दोषी आढळणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतक-यांच्या शेतपिकांचे नुकसान होऊ नये म्हणुन आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

सदर काम ॲपको इन्फ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी मार्फत प्रगतीत आहे. माहे जानेवारी, २०२१ मध्ये कल्याणा शिवारातील शेतकरी कुऱ्हाड घेऊन शेतात काम करीत असताना, कंत्राटदाराच्या साहित्याच्या वाहतुकीसाठी बांधण्यात आलेल्या अंतर्गत रस्त्यावरील वाहतुकीमुळे उडणाऱ्या धुळीपासून होणाऱ्या त्रासापासून सुरक्षा उपाययोजना म्हणून रस्त्यावर पाणी शिंपडण्यासाठी सांगत होते. त्याने अंतर्गत रस्त्यावरील वाहतुक काही वेळासाठी बंद पडली होती. तथापि, काम बंद पाडण्यात आले नाही. महामार्गाच्या कामामुळे स्थानिक शेतकऱ्यांना धुळीचा त्रास होऊ नये यासाठी रस्त्यावर नियमितपणे पाणी शिंपडण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

महामार्गाच्या बाजूला लागून असलेल्या शेतपिकांवर काही प्रमाणात धुळ उडते तथापि, पिकांचे नुकसान टाळण्यासाठी कंत्राटदारामार्फत नियमितपणे रस्त्यावर पाणी शिंपडण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह ठाणे मधील बहुतांश रुग्णालये अग्निसुरक्षेविना असल्याबाबत

**(२१) * २०७५८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.देवेंद्र फडणवीस**

**(नागपूर दक्षिण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रुग्णालयांमध्ये राज्यभरातून रुग्ण उपचारासाठी येत असतात तथापि बहुतांश रुग्णालयांनी अग्निशामक तपासणी केली नसून अग्नीसुरक्षा नियमांचे उल्लंघन करित असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील रुग्णालयांमध्ये आजतागायत घडलेल्या आगीच्या घटना या बहुतांश वेळी निकृष्ट दर्जाचे विद्युत वायरिंग ,फिटिंग आदि कारणामुळे होत असून मॉल, कार्यालय, रुग्णालय अशा सार्वजनिक ठिकाणी नागरिक मोठ्या प्रमाणात जात असल्याने तेथे दोन वर्षांनी अग्निसुरक्षा तपासणी होणे गरजेचे असूनसुद्धा ती होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे ३५० हून अधिक रुग्णालये असून मागील वर्षी महानगरपालिकेने शहरातील २३१ रुग्णालयांची अग्निसुरक्षा तपासणी केली असता, त्यावेळी फक्त १८१ रुग्णालयांकडे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र असून उर्वरित १४० रुग्णालयांकडे ना- हरकत प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्याने ठाणे शहरातील विविध रुग्णालयांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या महासभेत व स्थायी समितीच्या बैठकीतही सदर मुद्दा उपस्थित करण्यात आला असुन अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र नसलेली रुग्णालये ४८ तासांत सील करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने २ वर्षांपूर्वी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानूसार भंडारा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासनाने मुंबईतील सर्व रुग्णालयांचे तात्काळ फायर ऑडिट करण्याचा निर्णय घेतला असून यावर कधीपर्यंत अंमलबजावणी होणार आहे, तसेच ठाणे शहरातील अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नसलेल्या रुग्णालयांवर कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरोधात कायदेशीर कारवाई तसेच

अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र नसलेल्या रुग्णालयांच्या विरोधातही कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालयांची अग्निसुरक्षा तपासणी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत करण्यात येत असून, सदर तपासणीदरम्यान निदर्शनास आलेल्या अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या त्रुटी व संबंधित त्रुटींची पूर्तता करण्याकरिता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंतर्गत संबंधितांना नोटीस देऊन कारवाई करण्यात येते.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आग लागण्याच्या कारणांचा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने अभ्यास केला असता, बहुतांश प्रकरणांमध्ये "सदोष विद्युत प्रणाली" हे कारण आढळून येते.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ३ नुसार इमारतींमध्ये बसविण्यात आलेल्या अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी मालक/भोगवटादार यांची आहे. तसेच, सदर यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतची माहिती प्रपत्र "ब" द्वारे लायसन्सप्राप्त अभिकरणमार्फत महानगरपालिकेच्या अग्निशमन दलास प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्यात सादर करणे आवश्यक आहे.

(३) सन २०१८-१९ मध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे महानगरपालिकेमार्फत तपासणी करण्यात आलेल्या ३३४ रुग्णालयांपैकी १२६ रुग्णालयांना महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच, ५७ रुग्णालयांच्या नस्त्या नगररचना विभागाकडे "चेंज ऑफ युझर" साठी पाठविण्यात आल्या आहेत.

उर्वरित १५१ रुग्णालयांच्या आस्थापनाधारकांना आगप्रतिबंधक उपाययोजनांसंबंधी कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत कळविण्यात आले आहे. तथापि सदर रुग्णालय आस्थापनाधारकांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्यामुळे त्यांना महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत ना-हरकत

प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

(४) मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक ११/२०१८ मध्ये दिनांक १८ एप्रिल, २०१९ रोजी मा. न्यायालयाने रुग्णालय सील करण्याबाबत आदेश दिले आहेत.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत अग्निसुरक्षेच्या दृष्टीने एकूण १३२४ विविध रुग्णालयांची (खाजगी रुग्णालये/नर्सिंग होम/मॅटर्निटी होम) तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६३ रुगणालयांमध्ये अग्निसुरक्षा उपाययोजनांसंबंधी त्रुटी आढळून आल्यामुळे त्यांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, एकूण ३८ शासकीय व महानगरपालिका रुग्णालये यांची सुध्दा तपासणी करुन अग्निसुरक्षा उपाययोजनांसंबंधी त्रुटींची पूर्तता करुन घेण्यासाठी पत्र देण्यात आले आहे.

भंडारा दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर दिनांक ११.०१.२०२१ रोजी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ३४७ रुग्णालयांची अग्निशमन विभागामार्फत तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २८ रुग्णालये बंद असल्याचे निदर्शनास आले आहे. १५१ रुग्णालयांनी फायर कम्प्लायन्स सादर केले असून, फायर कम्प्लायन्स सादर न केलेल्या उर्वरित १६८ रुग्णालय आस्थापनांवरफायर कम्प्लायन्स सादर करण्याकरिता दिनांक २२.०२.२०२१ पर्यंत मुदत दिली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेचे भूखंड खाजगी व्यक्तींनी ताब्यात घेतल्याबाबत

**(२२) * २४०४३ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेचे सुमारे ३० ते ४० भूखंड खाजगी व्यक्तींनी बळकावले असून त्रिमूर्ती चौकातील एका भूखंडाच्या पीआर कार्डवरून महानगरपालिकेचे नाव नुकतेच वगळण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेतील मालमत्ता विभाग व नगर रचना विभागात समन्वयचा अभाव असल्याने तसेच अनेक भूखंड महानगरपालिकेच्या नावावर नसल्याने खाजगी लोकांनी सदर भूखंड बळकाविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याने शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) • औरंगाबाद महानगरपालिकेचे सुमारे ३० ते ४० भूखंड खाजगी व्यक्तीने बळकावले, हे खरे नाही.
• तथापि, जानेवारी २०२१ मध्ये त्रिमूर्ती चौकातील एका भूखंडाच्या मोजणीच्यावेळी आखीव पत्रिकेवरुन महानगरपालिकेचे नाव वगळण्याची बाब निदर्शनास आली, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) • औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मौ.गारखेडा, विनायक नगर, त्रिमुर्ती चौक येथील न.भू.क्र.१५३५९/ ३४/२/१ ही मिळकत महानगरपालिकेच्या मालकीची असून मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षित आहे.
• नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांनी १९९५ मध्ये विकास प्राधिकरणाची पूर्व परवानगी न घेता नवीन मिळकत पत्रिका उघडून त्यास संबंधित खरेदीदाराचे नाव लावले.
• याबाबत नगर भूमापन कार्यालय, औरंगाबाद कडून सदर जागेची मोजणी कामी नोटीस प्रसिध्द करण्यात आली. मोजणीसाठी प्रत्यक्ष जागेवर महानगरपालिकेचे कर्मचारी पाठविले असता, मोजणी करावयाची मिळकत ही महानगरपालिकेची असल्याचे निदर्शनास आले.

- त्यानुसार महानगरपालिकेतर्फे आक्षेप घेण्यात आला असून, नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांनी सदर मिळकतीसाठीची मोजणी व नामांतर करण्याच्या प्रस्तावास स्थगिती दिली आहे.
- तसेच, या संदर्भात अधिक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(२३) * २०८६४ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम सातपुते (माळशिरस), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाला सन २०१७ पासून सुरुवात करण्यात आली, परंतू अद्यापही सदर प्रकल्प रखडला असतांना 'बीडीडी'चाळ प्रकल्पाच्या निविदेतील अटी-शर्ती, तसेच आराखड्यामध्ये बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, यामुळे मूळ निविदेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.डी.डी. चाळीतील रहिवाशांना संक्रमण शिबीराऐवजी थेट पुनर्वसन इमारतीत स्थलांतर करण्यासाठी २२ मजल्यांच्या इमारतीऐवजी ४० मजल्यांची इमारत बांधण्यासाठीचा अभ्यास करण्यासाठी दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास उपाध्यक्ष म्हाडा व अन्य अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे तसेच बीडीडी चाळ पुनर्वसन आराखड्यात बदल केल्याने खर्चात रुपये ४५०० कोटींची वाढ झाली असून सदरचा खर्च उचलण्यास म्हाडाने असमर्थता दर्शविली असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास उपाध्यक्ष म्हाडा यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्गावरील बीडीडी चाळींच्या पुर्नविकासाची प्रक्रिया संथगतीने सुरु असल्याने निवड झालेल्या कंपन्यांनी प्रकल्पातून माघार घेण्याचे पत्र म्हाडाला दिले होते तसेच ना.म.जोशी मार्ग येथील पुनर्वसन इमारतींमध्ये स्थलांरित झालेल्या पात्र भाडेकरुंना घरे वितरित करण्याची आयोजित केलेली सोडत तीन वेळा रद्द केली असुन सदर बी.डी.डी. चाळींच्या अधीकृत वास्तुविशारदांच्या बैठकीत म्हाडा मार्फत “वास्तु विशारद” स्पर्धेत बाद ठरविण्यात आलेल्या कंत्राटदारामार्फत सादरीकरण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिवडी ( मुंबई ) येथे मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीच्या भूखंडावर असलेल्या बी.डी.डी.चाळींच्या पुनर्विकासाकरीता मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीचा भूखंड म्हाडाला हस्तांतरीत करण्यासाठीच्या मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असुन शिवडी येथील बी.डी.डी.चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, मुंबईतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास जलदगतीने करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी तातडीने करावयाच्या उपाययोजना सूचविण्यासाठी दि.२९/१२/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये उपाध्यक्ष, म्हाडा यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली आहे. सदर समितीने दि.१५/०२/२०२१ रोजी अहवाल शासनास सादर केलेला आहे.

सदरहू समितीचा अहवाल मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या विचारार्थ सादर केला आहे. सदरहू समितीच्या शिफारशीनंतर उचित निर्णय शासन स्तरावर घेण्यात येणार आहे.

(३) नायगांव येथील प्रकल्पाचे काम सुरु होऊ न शकल्यामुळे प्रकल्पाचे कंत्राटदार मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लिमिटेड यांनी दि.०३/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये कंत्राट संपुष्टात (Termination of Contract) आणण्याबाबत नोटीस जारी केली होती. तथापि, कंत्राटदाराने दि.०४/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाचे काम सुरु ठेवण्याबाबत संमती दर्शविली आहे.

तथापि, वरळी व ना. म. जोशी मार्ग येथील प्रकल्पाच्या कंत्राटदाराने प्रकल्पातून माघार घेण्याबाबतची अशी कोणतीही नोटीस दिलेली नाही.

ना. म. जोशी मार्ग येथील स्थलांतरित झालेल्या भाडेकरुंच्या प्रस्तावित पुनर्वसन सदनिका निश्चित करण्यासाठी आयोजित केलेली सोडत कोविड-१९ चा प्रादुर्भाव व काही तांत्रिक कारणामुळे तीनवेळा रद्द करण्यात आली आहे. तथापि या संगणकीय सोडतीचा कार्यक्रम दि.११/०२/२०२१ रोजी मा. मंत्री (गृहनिर्माण) व मा. मंत्री (पर्यावरण) यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

(४) शिवडी (मुंबई) येथील बी.डी.डी. चाळ ही मुंबई बंदर न्यासाच्या जागेवर असल्याने सुसाध्यता अहवाल मुंबई बंदर न्यास (BPT) यांना शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेने दि.१६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. त्याबाबत अद्याप मुंबई बंदर न्यासाचा निर्णय अप्राप्त आहे.

(५) व (६) बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी शासनाने दि.२९/१२/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये उपाध्यक्ष, म्हाडा यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली आहे. सदरहू समितीने दि.१५/०२/२०२१ रोजी अहवाल शासनास सादर केलेला आहे.

सदरहू समितीचा अहवाल मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या विचारार्थ सादर केला आहे. सदरहू समितीच्या शिफारशीनंतर उचित निर्णय शासन स्तरावर घेण्यात येणार आहे.

-----------------

## उल्हासनगर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) नगररचना विभागाचे अभियंता यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(२४) * २२७६८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) नगररचना विभागाचे अभियंता श्री. परमेश्वर बुडगे यांना सन २०१० मध्ये ४१ दिवसांची पोलीस कोठडीची शिक्षा होऊनही त्यांना पुन्हा उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागातच नियुक्ती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तद्नुसार श्री.बुडगे यांना पुन्हा त्याच विभागात नियुक्ती देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, श्रीमती सुनिता तोरणे, नगरसेविका यांनी श्री.बुडगे यांच्यावर असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांची चौकशी करून त्यांचे निलंबन कायम करण्याबाबत आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार श्री.बुडगे यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी श्री. परमेश्वर बुडगे यांची उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०.०८.२०१३ रोजीच्या ज्ञापनाद्वारे विभागीय चौकशी करण्यात आली असता, अपचाऱ्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होत नाही असा चौकशी अहवाल दिनांक २४.०४.२०१५ रोजी सादर करण्यात आला आहे.

तसेच, श्री. बुडगे हे उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी असून, उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील “कनिष्ठ अभियंता” संवर्गातील एक अभियंता नियत वयोमानानुसार दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने तसेच, उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे श्री. बुडगे यांची दिनांक २५.०९.२०२० रोजी प्रशासकीय कारणास्तव नगररचना विभागात बदली करण्यात आली असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अशा आशयाची मागणी केलेले निवेदन उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

तथापि सदर कर्मचाऱ्याची नगररचना विभागातून इतर विभागात बदली करण्याचे दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२० रोजीचे निवेदन उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व अहमदनगर जिल्ह्याला जोडणा-या शहापूर-घाटघर रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२५) * २४१०८ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व अहमदनगर जिल्ह्याला जोडणा-या शहापूर-घाटघर रस्त्याचे सन २००१ मध्ये सर्वेक्षण होऊनही गत २० वर्षांपासून रस्त्याचे काम प्रलंबित असून रस्त्याच्या पुन:सर्वेक्षणासाठी तत्कालीन शासनाने सन २०१६-१७ च्या आर्थिक अर्थसंकल्पात रुपये ५० लाखांची तरतूद करुनही वन विभागाच्या विविध परवानग्या अभावी सदर रस्ता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता शहापूर तालुक्यातील डोळखांब, तळवाडे, मेट, हिंगळुन गावाच्या हद्दीतून जाणार असल्यामुळे ४४ किमी अंतर कमी होणार असून अनेक लोकप्रतिनिधींनी यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू रस्त्याचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) नाही.

सदर रस्त्याच्या सर्वेक्षणासाठी २०१६-१७ मध्ये रु. ५०.०० लक्ष तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या तथापि, निविदेस कोणाचाही प्रतिसाद मिळालेला नाही.सदर कामास २०२१-२२ मध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार वाढीव तरतूद करण्याचे नियोजन आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्याच्या बांधकामाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील न्याहाडी- वाल्हीवरे रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२६) * २१९४२ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील न्याहाडी-वाल्हीवरे या सुमारे दहा किमी अंतराच्या रस्त्यावर अनेक खड्डे पडले असून खडीही निघालेली आहे, तसेच नागमोडी वळणामुळे रस्त्याची पुर्णत: दुरवस्था झाली असल्याने या दुर्गम परिसरातील आदिवासींना रस्त्या अभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८ मध्ये या रस्त्याचे डांबरीकरण झाले, मात्र त्यानंतर अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्याने या रस्त्याने एस.टी. तसेच खाजगी वाहनेही जात नाहीत, त्यामुळे तेथील स्थानिकांना वाहतुकीच्या साधनांअभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असुन सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे म्हणून गत पाच वर्ष सातत्याने मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे, मा. पालकमंत्री, ठाणे जिल्हा आदींना लेखी निवेदनाद्वारे मागणी करूनही अद्याप रस्त्याचे काम दुर्लक्षीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम अद्यापही न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून सदरहू न्याहाडी-वाल्हीवरे या सुमारे दहा कि.मी. अंतराच्या रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्ता जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दर्जोन्नती झाल्यानंतर हस्तांतरीत करण्यात आला आहे. रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली असून, सद्य:स्थितीत सदर काम निविदा स्तरावर आहे.

(३) व (४) कोव्हीड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे अर्थव्यवस्थेवरील वित्तीय उपाय योजना करण्यासाठी सर्व कामांना स्थगिती देण्यात आली होती. तथापि आता सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. निविदा निश्चिती नंतर निधी निकष व प्राधान्यक्रमाने काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग-कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणा-या भैरीची पाणंद घाट रस्त्याचे अपूर्णावस्थेत असलेले काम पूर्ण करणेबाबत

**(२७) * २०६७७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग- कोल्हापूर या दोन जिल्हयांना सर्वात कमी अंतराने जोडणारा भैरीची पाणंद हा शीवकालीन घाट कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंजिवडे व भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाटगाव दरम्यान असून केवळ साडेचार कि.मी. अंतराच्या या घाटाचे काम अपूर्णावस्थेत असुन रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम खाते व वन खात्याने संयुक्तीक सर्व्हेक्षण करुन केवळ ३२ कोटी रुपयांचा खर्च निर्धारित केलेला कुडाळ तालुक्यातील आंजिवडे जवळील भैरीची पाणंद हा शीवकालीन घाट अद्यापही पूर्ण झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू घाट रस्त्याचे अपूर्णावस्थेत असलेले काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्यात यावे म्हणून त्या परिसरातील ग्रामस्थांनी मागील २ वर्षांपासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सिंधुदुर्ग-कोल्हापूर हे दोन जिल्हे जोडणाऱ्या सर्वात कमी अंतराच्या रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) प्रश्नांकित सिंधुदूर्ग- कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणाऱ्या घाट मार्गाचे प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात आले असून, त्यानुसार एकूण ५.११० कि.मी. घाट मार्गाचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

सदर घाट मार्गाच्या लांबीपैकी ४.११० कि.मी. लांबी वनक्षेत्र हद्दीतून जाते. त्यापैकी ३.११० कि.मी. लांबी सिंधुदूर्ग जिल्हयात व १.०० कि.मी. लांबी कोल्हापूर हद्दीत येते.

सदर घाटरस्ता बांधकामासाठी अंदाजित खर्च रु. ३२.३६ कोटी इतका असून, सदर घाट मार्गाचे काम कोणत्याही योजनेतून मंजूर नसल्याने अद्याप पूर्ण झालेले नाही.

(३) याबाबत श्री. बाळा सावंत, अध्यक्ष टाळंबा धरणग्रस्त कृति समिती, मु. दुकानवाड यांचे दिनांक २८.०६.२०१६ चे निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे.

(४) सिंधुदूर्ग- कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणाऱ्या घाट मार्गाचे काम निधी निकष प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द झाल्यानंतर १६ हजार एकर भूखंड शासनाच्या ताब्यात न मिळाल्याबाबत

**(२८) * २३४४३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) " नागरी कमाल जमीन धारणा कायदा " रद्द झाल्यानंतर शासनाने ३७ हजार एकर भूखंड ताब्यात घेणे आवश्यक असतानाही केवळ १७ हजार एकर भूखंड उपलब्ध आहेत त्यापैकी सुमारे एक हजारच भूखंड शासनाने संपादित केले असून उर्वरित १६ हजार एकर भूखंडावर अनधिकृतरित्या काही उद्योजक व विकासक यांनी परस्पर कब्जा केलेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी कमाल जमीन धारणा कायद्यातील कलम २० (१) अन्वये सवलतीत मिळालेले भूखंड ज्या प्रयोजनासाठी आहेत त्यासाठी वापरले जाणे, आवश्यक असताना तसा वापर होत नसल्यामुळे ते भूखंड शासनाने ताब्यात घ्यावेत आणि त्यावर सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्प राबवावे असा आदेश मा.उच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठाने सन २०१४ मध्ये वा त्या दरम्यान दिलेला असून अद्याप त्यानूसार कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने दिलेला निर्णय मान्य न करता शासनाने न्या.बी.एन.श्रीकृष्ण आयोग नेमला आहे या आयोगाच्या शिफारशींचे स्वरुप काय आहे व उक्त भूखंडांचा ताबा, वापर, वितरण तसेच कब्जा यात फार मोठया प्रमाणात अनियमितता तसेच गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) राज्य शासनाने नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ हा दि.२९.११.२००७ रोजी स्विकारला असून उक्त अधिनियमानुसार कलम २० अन्वये मंजुर केलेल्या योजना व कलम

१०(३)/१०(५) नुसार ताब्यात घेतलेल्या जमिनींना संरक्षण प्राप्त आहे.

परंतु, नाजकधा निरसन अधिनियमानुसार कलम २० च्या वैधतेबाबत महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसींग इंडस्ट्रीज व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर रिट याचिका क्र.९८७२/२०१० दाखल केली होती. उक्त याचिकेमध्ये मा.न्यायालयाने कलम २० खालील योजनेच्या अटी व शर्ती योजनाधारकांवर बंधनकारक असल्याचा दिलेला निर्णय, विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हानित झाला होता. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१०.११.२०१४ रोजी योजनाधारकांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होईल, अशी कारवाई (Coercive action) करु नये असे आदेश दिले होते. मा. न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर योजनाधारकाकडून योजनेखालील क्षेत्रांचा विकास होत नव्हता.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दि.१६.६.२०१७ अन्वये श्री.बी.एन.श्रीकृष्ण, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा. सर्वोच्च न्यायालय व श्री.बी.एन.मखीजा, सेवानिवृत्त सचिव, महाराष्ट्र शासन यांची द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेला अहवाल, त्याबाबतची शासनाची भुमिका व Consent Terms मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लीकेशनद्वारे दाखल करण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०२.०७.२०१९ रोजी व्दिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यास अनुमती दिल्याने शासन निर्णय दि.०१.८.२०१९ नुसार नाजकधा कलम २० खालील योजनांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार अधिमूल्याचा भरणा करुन योजनेखालील क्षेत्र रहिवास प्रयोजनार्थ विकासास अनुज्ञेय केलेले असून कमी आकारमानाच्या सदनिका ठेवण्याचे बंधन घालून गृहबांधणीस प्रोत्साहन दिलेले आहे. ज्या विकासकांना कलम २० च्या अटी / शर्तीनुसार योजना पुर्ण करावयाची असेल तर सदर विकासकांना त्यानुसार योजना पूर्णत्वास नेणेस प्रत्यवाय नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) नगरपरिषदेच्या हद्दवाढ प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**(२९) * २१७२२ श्रीमती श्वेता महाले (चिखली)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली नगरपरिषद (जि.बुलढाणा) यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी यांचेमार्फत चिखली नगरपरिषदेचा हद्दवाढ प्रस्ताव आवश्यक त्या ठराव व शिफारशीसह जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रमांक चिखली हद्दवाढ /२०१९/ जा क्र ३९३ दिनांक २२ /८/ २०१९ अन्वये शासनाकडे सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षे त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्याने माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर नगरविकास विभागाने मागणी केल्यानंतर परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) होय, हे खरे आहे.

• जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्याकडून पत्र प्राप्त झाले होते. तथापि, पत्रासोबतचा प्रस्ताव परिपूर्ण नव्हता.

(२) व (३) • चिखली नगरपरिषद हद्दवाढीसंदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १०/९/२०२० रोजी पत्र दिले होते, हे खरे आहे.

• जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव अत्यंत संक्षिप्त होता. प्रस्तावात आताच्या ७.८८ चौ.कि.मी. क्षेत्रात २४.८७ चौ.कि.मी. इतकी वाढ प्रस्तावित होती. तर मूळ ५७८८९ इतक्या लोकसंख्येत केवळ ९१९५ इतकी वाढ होत होती. तसेच मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्राचा यामध्ये समावेश होता.

• प्रस्तावात काही ग्रामपंचायतीच्या भागांचा हद्दवाढीत समावेश होता. तथापि, याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव नव्हता.

• या सर्व त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली असून नगरपरिषदेने आता शेती क्षेत्र वगळून व ग्रामपंचायतीचा भाग वगळून सुधारित प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्यामार्फत दिनांक ४/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

• सदर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीत विविध प्रभागांत अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात हानी झाल्याबाबत

**(३०) * २०९७२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, महानगरपालिका हद्दीत माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान विविध प्रभागात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली असून धनकवडी, बिबेवाडी, कात्रज, वारजेमध्ये तसेच कोंढवा, पद्मावती, अरण्यश्वेर, सहकारनगर, दत्तवाडी आणि जुन्या ओढ्यालगतच्या अनेक सोसायट्यांच्या सिमाभिंती वाहून गेल्या असून सोसायट्यांच्या पार्किंगमध्ये पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुरानंतर पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या पाहणीमध्ये नाल्यांवरील सर्वाधिक अतिक्रमणे ही कोंढवा आणि कात्रज परिसरात असल्याचे निदर्शनास आले असून नाल्यांमध्ये बेकायदा बांधकामे आणि अतिक्रमणे केलेल्या ८५ जणांना नोटीस देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात स्थानिक लोकप्रतिनिधींनी निधी मंजूर करूनही अद्यापपर्यंत निविदा प्रक्रिया केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच नाल्यांमध्ये असलेली बेकायदा अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे काढणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) • पुणे शहरात दि.१४ ऑक्टोबर, २०२० मध्ये तसेच त्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला होता. या पावसामुळे विविध प्रभागात नाला/ओढ्या लगतच्या सोसायटींच्या सिमाभिंती वाहून गेल्याचे निदर्शनास आलेले नाही, तथापि, या पावसामुळे काही सोसायट्यांच्या पार्किंगमध्ये पाणी शिरलेले होते, ही वस्तुस्थिती आहे.

• या पावसानंतर पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आलेली होती. पाहणीमध्ये धनकवडी, बिबेवाडी, कात्रज, वारजेमध्ये तसेच कोंढवा, पद्मावती, अरण्यश्वेर, सहकारनगर, दत्तवाडी या परिसरात रस्त्यावर पाणी साठलेले होते, असे दिसून आले.

• त्यामुळे वहनक्षमता वाढण्यासाठी तातडीने नाला व ओढ्याचे खोलीकरण करण्यात आले असून, या परिसरातील नाला व गटारांची साफसफाई करण्यात आली आहे.त्यामुळे पाण्याचा निचरा त्वरीत झाला असून या पावसामुळे कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झालेली नाही,असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तथापि यापूर्वी दि.२५.०९.२०१९ रोजी उद्भवलेल्या अतिवृष्टीच्या वेळी आंबील ओढा येथील पूरामुळे सदर नाल्यालगतची अंदाजे १०३५ रनिंग मीटर सिमाभिंत वाहून गेलेली आहे.

• या अतिवृष्टीमुळे आंबिल ओढा व आसपासच्या परिसराला पूर येवून नाल्यातील पाणी सोसायटींमध्ये शिरल्यामुळे ठिकठिकाणी नागरीकांचे मोठयाप्रमाणावर नुकसान झाले होते. तसेच नाल्यामधील पाणी इतरत्र पसरून

जिवीत व वित्त हानी मोठ्या प्रमाणावर झाली होती.

• त्यावेळी पुणे शहरातील आंबिल ओढा नाल्याचे व परिसरातील ३५४ मिळकतींमध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण करण्यात आले होते.

• पुणे महानगरपालिकेने या परिसरातील एकूण ७९ बेकायदेशीर बांधकामांना नोटीस दिल्या असून त्यात कोंढवा खुर्द व कोंढवा बुद्रुक येथील ४ व कात्रज येथील सुमारे १६ बांधकामांचा समावेश आहे. तसेच ४ ठिकाणी कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) व (४) • आंबील ओढयामध्ये आलेल्या पुरामुळे झालेल्या सार्वजनिक नुकसानीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेमार्फत दुरूस्तीचे काम करण्यात येत असून, या कामात कल्व्हर्ट पूलाची उंची वाढवीणे, नाल्याची ट्रंकलाईन दुरूस्ती करणे, शहरातील विविध भागात पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींसाठी संरक्षण भिंत बांधणे इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव असून आंबील ओढ्यातील गाळ काढून नाला खोलीकरणाचे काम करण्यात आले आहे.

• आंबील ओढ्याच्या बाजूने सिमाभिंती बांधण्यासाठी ३ निविदा काढल्या असून त्यापैकी २ निविदांबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झालेली आहे. तसेच एका निविदेचे कार्यादेश देवून काम सुरु करण्यात आले आहे.

• पुणे महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात या कामाकरीता रू.२६.४० कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. त्याव्यतिरिक्त मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी रू.२२.५० कोटी एवढी तरतूद उपलब्ध करून दिली आहे. त्याअनुषंगाने निविदा प्रक्रिया करून सिमाभिंत बांधण्याचे काम सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांवर बनावट प्रमाणपत्रे सादर करुन बिगर आदिवासींनी नोकऱ्या मिळविल्याबाबत

**(३१) * २०९४४ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), श्री.गणपत**

**गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांवर जातीची बनावट प्रमाणपत्रे सादर करुन मोठ्या प्रमाणावर बिगर आदिवासींनी नोकऱ्या मिळविल्याची प्राप्त झालेल्या तक्रारींवर दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास एका प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जमातीच्या आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या बिगर आदिवासींना शासकीय सेवेत संरक्षण देता येणार नाही व त्यानुसार राज्य शासनाने त्याबाबत कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जातीचे बनावट दाखले देऊन अनुसूचित जमातीच्या आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या १२ हजारांहून अधिक बिगर आदिवासी अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या विविध विभागांत अधिसंख्य पदे निर्माण करुन ११ महिन्यांच्या कालावधीसाठी फेरनियुक्त्या देण्यात आल्या असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिगर आदिवासी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या फेरनियुक्त्यांची प्रक्रिया ही अद्यापही सुरुच आहे, मात्र १२ हजार जागा रिक्त होऊनही गत दोन वर्षात फक्त २८ आदिवासी उमेदवारांच्याच नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचेही माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सरकारी नोकरीपासून वंचित राहिलेल्या खऱ्या आदिवासींना तातडीने नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती विशेष मोहिम राबविली आहे वा राबविण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/ २०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) च इतर याचिका यामध्ये दि.६.७.२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व सदर जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे निदेश देण्यात आलेले आहेत.

(२) व (३) सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झालेल्या माहितीनुसार या विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या ३०४३ अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले आहे. आतापर्यंत अनुसूचित जमातीच्या ६१ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

(४) या विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना दि.३१.१२.२०१९ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी अधिसंख्य पदावर वर्ग करुन सदर रिक्त झालेली पदे दि.१.२.२०२० पर्यंत कालबद्ध कार्यक्रमानुसार भरण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत. तथापि, कोविड, १९ या महामारीमुळे सन २०२० मध्ये भरती प्रक्रिया राबविता आली नाही. चालू वर्षात अधिसंख्य पदांमुळे रिक्त झालेली सर्व पदे भरण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळ सेवेतील मेगा भरतीसाठी बनावट कंपनीला कंत्राट दिल्याबाबत

**(३२) * २०३८९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला (एमपीएससी) सक्षम करण्याऐवजी महाआयटी विभागाने शासनाच्या सरळ सेवेतील मेगा भरतीसाठी परिक्षा प्रक्रिया राबविण्यास पात्र ठरविलेल्या चार खासगी कंपन्यांपैकी दोन कंपन्यांचा काळ्या यादीत समावेश असल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षा प्रक्रियेसाठी महाआयटीने पात्र ठरविलेल्या चारपैकी एका कंपनीला उत्तर प्रदेश शासनाने माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान तर दुस-या एका कंपनीला महाराष्ट्र राज्य परीषदेने माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान काळ्या यादीत टाकले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या विविध विभागांमधील अराजपत्रित पदांवरील भरती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सकारात्मक प्रतिसाद दिला असतांनाही ही भरती प्रक्रिया खाजगी संस्थेच्या माध्यमातून करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आल्यावर "एमपीएससी स्टुडंट्स राईट्स" या विद्यार्थी संघटनेच्यावतीने 'खाजगी संस्थेऐवजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फेच परिक्षा घेऊन भरती करावी' अशी मागणी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२०/ जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारच्या बनावट कंपनीला कंत्राट दिल्यामुळे परिक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, देशातील विविध प्रकारच्या परीक्षा घेणा-या विश्वासू कंपन्यांना डावलून उत्तर प्रदेश शासन व महाराष्ट्र राज्य परिषदेने काळ्या यादीत टाकलेल्या दोन कंपन्यांची शिफारस करण्यात आल्याने या प्रकरणी शासन त्वरीत चौकशी करुन दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई करणार वा करीत आहे,

(६) असल्यास, अराजपत्रित पदांवरील भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) व (२) महाआयटीने पाठविलेल्या माहितीनुसार महाआयटी यांनी प्रसिध्द केलेल्या निविदेत भाग घेतलेल्या सर्व कंपन्यांची तांत्रिक पडताळणी अतिशय काटेकोर पध्दतीने पार पाडण्यात आली आहे. तांत्रिक पडताळणी करीत असताना काळ्या यादीत नावे आढळलेल्या कंपन्या निविदा प्रक्रियेतून वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित कंपन्या हया कुठल्याही संस्थेमध्ये

काळ्या यादीत समाविष्ट नाहीत अथवा काळ्या यादीतून वगळण्यात आल्या बद्दलचे पुरावे या कंपन्यांनी सादर केले आहेत व त्या नंतरच या कंपन्यांची निवड महाआयटी यांनी केलेली आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय कार्यालयातील गट- "ब" (अराजपत्रित), गट-"क" संवर्गातील पदभरती आयोगामार्फत करण्याच्या प्रस्तावास काही अटींच्या अधिन राहुन मान्यता दिली आहे.

तसेच " राज्यातील गट "ब" (अराजपत्रित) व गट "क"पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेणेबाबत "एमपीएससी स्टूडंट्स राईट्स" (MPSC STUDENTS RIGHTS) यांचेकडून दिनांक ३०/०९/२०२० व दिनांक ०४/११/२०२० अन्वये मा. उपमुख्यमंत्री व मा. राज्यमंत्री (सामान्य प्रशासन विभाग) यांना अग्रेषित केलेली पत्रे विभागास प्राप्त झाली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) निविदेतील अटींनुसार निवड झालेल्या कंपन्यांपैकी एखादी कंपनी प्राप्त पुराव्यांनुसार दोषी आढळल्यास त्या कंपनीस निवड यादीतून कमी करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(६) भूतपूर्व दुय्यम सेवा निवड सेवा मंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोटयातील गट "ब" (अराजपत्रित) व गट "क" संवर्गातील पदांच्या स्पर्धा परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर (जि.सोलापूर) महानगरपालिकेत स्मार्ट सिटी अंतर्गत क्रिसिल या सल्लागार कंपनीने गैरव्यवहार केल्याबाबत

**(३३) * २३८९८ श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (जि.सोलापूर) महानगरपालिकेत स्मार्ट सिटी अंतर्गत क्रिसिल या सल्लागार कंपनीचा गैरव्यवहार निदर्शनास आला असून या कंपनी

अंतर्गत  दोन अन्य कंपन्या देखील काम करीत असून त्यांच्या कामावर कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाबाबत स्मार्ट सिटी कार्पोरेशनला सल्ला देण्याबरोबरच प्रकल्पाचा आराखडा (design) करणे रेकॉर्ड ठेवणे या कामाचा ठेका क्रिसिल कंपनीला दिला होता यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याने क्रिसिल कंपनीचे काम थांबविण्यात आले असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्मार्ट सिटी प्रशासनाने शासनाकडे याबाबतचा अहवाल पाठविला आहे काय, तसेच सदर काम देत असताना कंपनीस नियम व अटी घालण्यात आल्या आहेत काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) • सोलापूर शहराचा केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी समावेश करण्यात आला आहे.

• सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता मुख्य सल्लागार नियुक्त करणेकरिता केंद्र शासनाच्या सूचनानुसार सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. द्वारा रीतसर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

• प्राप्त निविदांच्या छाननीनंतर क्रिसिल रिस्क इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लि. या कंपनीस मुख्य सल्लागार म्हणून दिनांक ३० सप्टेंबर,२०१६ रोजी करार करून रीतसर नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

• सदर करारामध्ये कंपनीच्या कामाचे स्वरूप व त्यासंबंधीच्या अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत.

• सदर नियुक्ती आदेशात स्मार्ट सिटी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी कामाच्या प्रगतीनिहाय व दरमहा अशी विभागणी करून करारनामा करण्यात आला होता. सदर करारनाम्यानुसार आतापर्यंत रुपये ७.९२ कोटी इतकी रक्कम क्रिसिल कंपनीने पुरविलेल्या सेवेसाठी अदा करण्यात आली आहे.

• क्रिसील कंपनीने प्रकल्प अंमलबजावणीकरिता आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्यात कसूर केल्याचे निदर्शनास आल्यामुळे दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार करारनाम्यातील तरतुदीनुसार नोटीस देऊन नोटीस कालावधी अंती क्रिसिल कंपनीची सेवा दिनांक ०३ जानेवारी, २०२१ रोजी बंद करण्यात आलेली आहे.

• याबाबतचा प्रस्ताव सोलापूर स्मार्ट सिटी कंपनीच्या संचालक मंडळापुढे अंतिम निर्णयासाठी सादर करण्यात आलेला असून संचालक मंडळाच्या निर्णयानंतर याबाबतचे अंतिम आदेश पारित करण्यात येणार आहेत.

-----------------

## गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मौजा चेकबापूर, सकमूर येथील शेतकऱ्यांना भूसंपादीत जमिनीचा मोबदला मिळणेबाबत

**(३४) * २२६५८ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गोंडपिपरी, धाबा ते पोडसा रामा-३६९ रस्त्याकरीता मौजा चेकबापूर, सकमूर येथील शेतकऱ्यांच्या जमिनी ५० वर्षापूर्वी भूसंपादीत करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूसंपादीत जमिनीचा मोबदला सदरहू शेतकऱ्यांना तातडीने देण्याबाबत मा. लोकप्रतिनीधी यांनी दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर शेतकऱ्यांना भूसंपादीत जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

गोंडपिंपरी तालुक्यातील धाबा ते पोडसा रस्त्याकरीता मौजे सकमूर चेकबापूर येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन करण्याकरीता सन २००७ मध्ये प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

(२) हे खरे आहे.

(३) भूसंपादन कायदा - २०१३ नुसार नव्याने भूसंपादन प्रस्ताव तयार करून मोबदला देण्याकरीता सदरचे काम अर्थसंकल्पित करण्याकरीता प्रस्तावित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील तीन वर्षाहून प्रलंबित असलेले व सुरु न झालेले प्रकल्प ताब्यात घेऊन म्हाडातर्फे पुनर्विकास करण्याबाबत

**(३५) * २३३११ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या उपकरप्राप्त मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र जारी केल्यावर पाच वर्षात प्रकल्पाचे काम सुरु न करणाऱ्या सुमारे ४६४ प्रकल्पांना म्हाडातर्फे दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास नोटीसा बजावण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान मंजुर केलेल्या कायद्यानुसार तीन वर्षाहून प्रलंबित असलेले व सुरु न झालेले प्रकल्प ताब्यात घेऊन त्याचा म्हाडाने स्वत: पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदरहू दिर्घकाळ प्रलंबित असलेले व काम सुरु न झालेल्या प्रकल्पाच्या पुनर्विकासासाठी अद्यापपर्यंत शासनाने एकूण किती निधी उपलब्ध करुन दिला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने पुर्वी ज्या उपकरप्राप्त इमारतींना विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले होते, त्या सर्व प्रकरणांचा आढावा मंडळाने माहे सप्टेंबर-२०२० महिन्यात घेतला असता, अंदाजे ४६४ प्रकरणांमध्ये ना-हरकत प्रमाणपत्रधारकांनी कामे सुरु केली नाहीत. त्यामुळे मंडळाने प्रकरणनिहाय तपासुन ना-हरकत प्रमाणपत्रधारकांना नोटीस बजावण्याचे काम

सुरु केले आहे. माहे फेब्रुवारी-२०२१ अखेरपर्यंत अंदाजे एकूण ३७२ ना-हरकत प्रमाणपत्रधारकांना नोटीस बजाविण्यात आली आहे.

(२) मुंबई शहरातील जीर्ण व धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्याकरिता मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडातर्फे भूसंपादन करुन पुर्ण करण्याकरिता म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास पावसाळी अधिवेशन-२०२० मध्ये सभागृहाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर विधेयकास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली असून, महामहिम राष्ट्रपती महोदयांकडे पुढील मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे. म्हाड अधिनियमात सुधारणा अंतिम झाल्यानंतर मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडातर्फे ताब्यात घेऊन त्यांचा पुनर्विकास करण्यात येईल.

(३) मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या निधीबाबतचा निर्णय म्हाड अधिनियमातील प्रस्तावित सुधारणा अंतिम झाल्यानंतर घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्जुनी/मोरगांव (जि.गोंदिया) येथील कोहमारा-देसाईगंज महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

**(३६) * २०८७० श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी/मोरगांव (जि.गोंदिया) विधानसभा क्षेत्रातील कोहमारा-देसाईगंज हा राष्ट्रीय महामार्ग खड्डेमय व जीर्ण झालेला असून रस्ता दुरुस्तीचे काम गत २ वर्षापासुन संथगतीने सुरु असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कंत्राटदारांनी खड्डे न भरताच कागदोपत्री काम दाखवून अधिका-यांच्या संगनमताने परस्पर देयके घेतलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधीत दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच कोहमारा-देसाईगंज रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

कोहमारा- देसाईगंज हा रस्ता राज्यमार्ग (प्ररामा-११) दर्जाचा असून सदर रस्त्याचे ६३/३०० किमी ते ११५/७०० किमी लांबीमध्ये हॅम(पॅकेज क्र.१३५) अंतर्गत काम प्रगतीत असून सदर रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात आले आहेत. तसेच उक्त रस्त्याचा काही भाग 'ब्रम्हपूरी-वडसा(देसाईगंज)-कुरखेडा-कोरची' हा राष्ट्रीय महामार्ग क्र.५४३ असून त्याची लांबी १.५० कि.मी आहे.सदर १.५० कि.मी लांबी सुध्दा खड्डे विरहित असून सद्यस्थितीत सुस्थितीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील संक्रमण शिबिरातील सदनिकांच्या भाड्यापोटी म्हाडाचे १०० कोटी रूपये विकासकांनी थकविल्याबाबत

**(३७) * २१३२७ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांचे स्थलांतर करावयाचे असल्यास म्हाडाच्या इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सध्या फक्त २५ सदनिका उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संक्रमण शिबिरातील सुमारे सात हजार सदनिकांपैकी सध्या साडेतीन हजार सदनिका विकासकांच्या ताब्यात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विकासकांनी सदर सदनिकांच्या भाड्यापोटी म्हाडाचे १०० कोटी रूपये थकविल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार सदर सदनिकांच्या भाड्यापोटीची रक्कम विकासकांकडून वसूल करण्याबाबत तसेच सदरच्या सदनिका म्हाडाच्या ताब्यात घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय,  हे खरे आहे.
(३) होय, हे अशंत: खरे आहे
(४) १. विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरिता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधीत पॅनल वकील यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ  यांनी कळविले आहे.
२. यापैकी विकासक मे.एस.डी.कॉर्पोरेशन यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ  यांच्याद्वारे शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.
३. तसेच विकासक मे.वर्धमान डेव्हलपर्स यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालयाकडे दाखल करावयाच्या Recovery Civil Suit चा मसूदा (Draft) म्हाडाच्या विधि विभाग यांचेकडे अभिप्राय/ तपासणी करुन मा.उच्च न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधीत पॅनल वकील यांचेकडे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दिला आहे.
४. संक्रमण गाळयांच्या भाड्याची थकबाकी असणाऱ्या विकासकांविरुद्ध म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कार्यवाही करण्याकरिता विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्ताबाबतचा तपशिल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी/ मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांना दि. २९.०९.२०१७

अन्वये व तसेच स्मरणपत्र दिनांक १९.०७.२०१८ तसेच स्मरणपत्र क्र २, दिनांक २३.१०.२०२० अन्वये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याद्वारे कळविण्यात आले असून त्याबाबतची माहिती अद्याप पर्यंत अप्राप्त आहे.

५. वि.नि.नि. ३३(१०) अंतर्गत १२ विकासक यांना संक्रमण गाळयापोटी थकीत भाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत सदर विकासक यांना इतर परवानग्या देण्यात येऊ नये याबाबत दिनांक २३.१०.२०२० अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण यांना मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

६. सर्व विकासकांना मंडळामार्फत थकीत रक्कमेचा भरणा त्वरीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

७. विकासकाना वितरीत करण्यात आलेल्या संक्रमण गाळयाच्या भाडयापोटी थकीत रक्कमेचा भरणा न करुन शासनाचे आर्थिक नुकसान केल्यामुळे थकबाकीदार विकासक याचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक १८.०३.२०१८ अन्वये एकुण १२ विकासक व दि. ०९.०२.२०२१ अन्वये नव्याने १० विकासक असे एकुण २२ विकासका विरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन येथे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने तक्रार दाखल केली आहे. उर्वरीत विकासक यांचे विरुध्द मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत पॅनल वकील यांच्याकडे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने आवश्यक ते दस्तऐवज पुरविले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या कारखाना विभागामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३८) * २१५६५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील दोनशेपेक्षा जास्त वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये रु २ कोटी ३१ लक्ष रुपयांची खरेदी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खरेदीमध्ये टायरची किंमत बाजारातील दुकानांमध्ये १४,८००.०० असतांना ३५,९५०.०० मध्ये, रेडीयल टायर १८,४००.०० असतांना ८५,४५६.०० मध्ये तथा इतर साहित्य बाजार भावापेक्षा जास्त किंमतीमध्ये खरेदी करण्यात आले आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त खरेदीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सन २०१५-१६ मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या कार्यान्वित ११८ वाहन/मशिनरीच्या देखभाल व दुरुस्ती करिता रु.९८.०४ लक्ष इतका खर्च करण्यात आलेला असून, सन २०१६-१७ मध्ये कार्यान्वित ११२ वाहन/ मशिनरीच्या देखभाल व दुरुस्तीकरिता रु.१३४.३६ लक्ष असा एकूण २३२.४० लक्ष इतका खर्च करण्यात आलेला आहे.

(२) नागपूर मनपाच्या कारखाना विभागाकडून करण्यात आलेली खरेदी ही, नागपूर मनपाच्या मंजूर दर करारानुसार करण्यात आलेली आहे.

सदरचे दर हे ई-निविदेद्वारे व व्यापक प्रसिध्दीने बाजारातून विविध पुरवठादाराकडून दर मागवून व निम्नतम दरावर वाटाघाटी करुन, दर करार अंतीम करण्यात आले आहेत. व त्यानुसार निविदेतील पात्र पुरवठा दाराकडून साहित्य खरेदी करण्यात येत आहे.

त्यानुसार या खरेदीमध्ये, रु.३५,९५०/-किंमतीचे ०१ साधे टायर व ०१ टयुब असून, रु.८५,४५६/- मध्ये ०२ रेडीयल टायर आणि ०२ टयूबचा समावेश आहे.

(३) व (४) यासंदर्भात, नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक ०८/१२/२०१७ च्या सर्वसाधारण सभेत, मा.नगरसेवकांनी दर तफावतीसंदर्भात केलेल्या तक्रारीच्या आधारे, महासभेने त्यावेळी दिलेल्या आदेशानुसार, कारखाना विभागातील संबंधीत कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते.

त्यांच्या विरोधात केलेल्या विभागीय चौकशी मध्ये त्यांचेवर दोषारोप सिध्द न झाल्याने, त्यांना पुन्हा कामावर घेण्यात आलेले आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेकडून विना प्रक्रिया मलजल व सांडपाणी समुद्रात व नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्याबाबत

**(३९) * २०४४७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांडपाणी समुद्रात सोडण्यापूर्वी महानगरपालिकेने त्यावर योग्य ती प्रक्रिया करावी मगच ते पाणी अरबी समुद्रात सोडावे तसेच सांडपाण्यावर महानगरपालिका प्रशासन प्रक्रिया करते की नाही हे तपासून त्याबाबत दर तीन महिन्यांनी अहवाल महानगरपालिकेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मागवून घ्यावा असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, मात्र या आदेशाची पूर्तता न करता न्यायालयाच्या सदरहू आदेशाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सांडपाणी तसेच कचरा मोठया प्रमाणावर समुद्रात सोडला जातो व मुंबई महानगरपालिकेकडून सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करताच हा कचरा व सांडपाणी समुद्रात सोडण्यात येते असा आरोप करित पूर्वी सिटीझन सर्कल फॉर सोशल वेल्फेअर अण्ड एज्युकेशन या संस्थेच्या वतीने ॲड. शेहजाद नक्वी यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती व सदर याचिकेची दखल घेत मा. मुंबई उच्च न्यायालयाने महानगरपालिका प्रशासन तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाला सदरहू आदेश माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेकडून प्रक्रिया न करता मलजल व सांडपाणी मिठी, दहिसर, पोयसर आणि ओशिवरा नदीत सोडल्यामुळे दूषित झालेल्या नद्या प्रदूषणमुक्त करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,

हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्या उपरोक्त निर्णयानूसार काम पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे व किती निधी खर्च करण्यात येणार आहे, तसेच या नद्यांचे रुंदीकरण केल्यामुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांचे त्याच परिसरात पुनर्वसन करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणा-या संबंधितांविरोधात जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर विनाविलंब कायदेशीर कारवाई करण्याबाबत, नदी किनारी नवीन मल:निस्सारण वहिनी टाकून सांडपाणी व मलजल अन्यत्र वळविण्याबाबत तसेच मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सांडपाणी व मलजल विना प्रक्रिया नदीत व समुद्रात सोडण्याचे प्रकार पूर्णपणे थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील सांडपाण्याची एकूण आठ सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून खालीलप्रमाणे विल्हेवाट लावली जाते :-

लव्हग्रोव्ह व वांद्रे सांडपाणी सुविधा केंद्रामध्ये मलजलावर प्राथमिक प्रकारची प्रक्रिया करुन ३.५ कि.मी. लांब समुद्रात पातमुखाव्दारे सोडण्यात येते.

वर्सोवा, घाटकोपर व भांडूप मलजल प्रक्रिया केंद्र व वातीत तलाव या ठिकाणी मलजलावर व्दिस्तरीय प्रक्रिया करुन मलजल अनुक्रमे मालाड व ठाणे खाडीत सोडले जाते.

चारकोप व कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्र अलीकडेच अद्ययावत करण्यात आले असून तेथे मलजलावर त्रिस्तरीय प्रक्रिया करुन मलजल सोडण्यात येत आहे.

मालाड येथील मलजल प्रक्रिया केंद्र येथे प्राथमिक प्रक्रिया केलेले मलजल मालाड खाडीत सोडले जाते.

वरील नमूद आठ मलजल प्रक्रिया केंद्रांपैकी सात जागी (मालाड मलजल केंद्र वगळून) महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने आखून दिलेल्या जुन्या मानकानुसार योग्य ती प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेले सांडपाणी महानगरपालिकेमार्फत समुद्रात / खाडीत  सोडले जाते व महाराष्ट्र राज्य प्रदूषण

नियंत्रण मंडळाकडून मलजलाच्या नमुन्याची वेळोवेळी चाचणी केली जाते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४)

| नद्याचे नाव | खर्च (अंदाजित) | कालावधी |
|---|---|---|
| मिठी नदी | २५०० कोटी | ५ वर्षे |
| दहिसर नदी | १८०.९९ कोटी | २४ महिने |
| पोयसर नदी | ७५१.६९ कोटी | ३६ महिने |
| ओशिवरा नदी | ५०३.४२ कोटी | ३६ महिने |

मिठी नदीचे रुंदीकरण केल्यामुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांना पर्यायी घरे देण्याच्या बाबतीत महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार कारवाई करण्यात येते.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील मलनि:सारण सुधारण्याकरीता चार घटकामध्ये कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

पहिल्या घटकानुसार अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर ९३.६८ कि.मी. लांबीच्या वाहिन्या टाकण्याचे उद्दीष्ट सन २३-२४ पर्यंत करण्याचे नियोजित असून आजपर्यंत १५.०५ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे तसेच ५१.१५ कि.मी. लांबीचे मलनि:सारण वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे.

दुसऱ्या घटकानुसार विकास नियोजनातील अविकसीत अतिक्रमीत रस्ते आणि झोपडपट्टी पुनर्विकास आराखड्यामधील रस्त्यांवर १४३ कि.मी. लांबीच्या मलजल वाहिन्या टाकण्याच्या कामाचा समावेश आहे.

तिसऱ्या घटकानुसार बिनपावसाळी प्रवाहाच्या माध्यमातून नद्यांमध्ये विसर्ग होत असणारा मलजलास अटकाव करुन अस्तित्वात असलेल्या मलनि:सारण वाहिनीस वळविण्याकरिता किंवा नविन मलनि:सारण वाहिनीचे जाळे निर्माण करुन सदर मलजल हा मलजल प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहून नेण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नेमणूक केलेल्या सल्लागारामार्फत कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

मिठी नदीत विसर्ग होणाऱ्या बिनपावसाळी प्रावाहास अटकाव करण्यासाठी चार टप्प्यामध्ये नियोजन केले आहे.

• पहिल्या टप्प्याच्या कामाचे कार्यादेश माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये देण्यात आले असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

• दुसऱ्या टप्प्याच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

• तिसऱ्या टप्प्यातील कामाच्या निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

• चौथा टप्प्यातील कामाची निविदा मागविण्यात आली आहे. तसेच दहिसर, पोईसर वालभट आणि ओशिवरा नद्यांच्या कामांची निविदा सुधारित सांडपाणी विसंर्ग मानकांच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या आहेत.

चौथ्या घटकानुसार स्वच्छ भारत, स्वच्छ महाराष्ट्र, स्वच्छ मुंबई अभियांनांतर्गत झोपडपट्टी किंवा इतर लहान रस्त्यावर घनकचरा विभागांतर्गत मलनि:सारण सुविधा पुरविण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) घाटातील रस्त्याच्या दुरूस्तीचे काम निधीअभावी अपूर्ण असल्याबाबत

**(४०) * २४०८१ श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे दरवर्षी हजारो पर्यटक भेट देत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हैसमाळ घाटातील रस्त्याचे काम निधीअभावी अपूर्ण असून रस्त्यांवर अनेक खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे तसेच माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान पडलेल्या पावसामुळे संपुर्ण रस्ता चिखलमय होऊन अनेक वाहने अडकून पडणे व दुचाकी वाहने घसरून पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हैसमाळ घाटातील रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण** : (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन खुलताबाद ते म्हैसमाळ प्रजिमा-२१ कि.मी. ०/०० ते ११/५०० रस्त्याची सुधारणा करण्याचे काम प्रगतीपथावर असून निधी उपलब्धतेच्या अधीन राहून पूर्ण करण्याचे नियोजन आहे. माहे. जानेवारी, २०२१ मधील आकस्मिक पावसामुळे वाहनचालकांची काही प्रमाणात गैरसोय झाल्याचे निदर्शनास आले असून क्षतिग्रस्त रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेकडे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मंजूर केलेले प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४१) * २३५५७ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांसाठी केंद्र शासनाने सन २०१५ पासून सुरू केलेल्या “पंतप्रधान आवास घरकुल योजना” अंतर्गत सन २०१५ पासून वसई-विरार महानगरपालिकेला (जि.पालघर) २६५ अर्ज प्राप्त झाले असून यातील १५७ मंजूर केलेले प्रस्ताव महानगरपालिकेकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३ वर्षापासून सदर १५७ प्रस्तावास मंजूरी मिळालेली असतानाही प्रस्ताव प्रलंबित असण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात आर्थिक दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांसाठी “पंतप्रधान आवास योजनेची” अंमलबजावणी करण्यात येत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर योजनेअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे आर्थिक व दुर्बल घटकांतर्गत एकूण २६५ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १६६ पात्र लाभार्थ्यांचे अर्ज सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता शासन नियुक्त KPMG या संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत.

(२) व (३) केंद्र शासनामार्फत सन २०१५ पासून सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शासनाने योजना लाभार्थ्यांची निवड निश्चिती करण्याकरीता KPMG या संस्थेस नियुक्त केले आहे. तथापि, सदर योजनेची प्रसिध्दी शिबिरे, कार्यशाळा व बॅनरद्वारे केल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान सदर योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या अल्प असल्याने योजनेच्या मार्गदर्शक सूचनातील निकषांमध्ये शासन परिपत्रक दिनांक २०.१०.२०१८ नुसार सुधारणा करण्यात आली आहे. तद्नंतर याआधारे वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात आले आहेत.

सदर योजनेअंतर्गत महानगरपालिकेकडे प्राप्त २६५ अर्जांची छाननी करण्यात आली आहे. तसेच बऱ्याच अर्जांमध्ये असलेल्या त्रुटींची पुर्तता करुन एकूण १६६ लाभार्थ्यांचे अर्ज महानगरपालिकेच्या प्रभाग समिती स्तरावर पात्र ठरविण्यात आले.

सन २०२० मध्ये उद्भवलेल्या कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर वसई-विरार शहर महानगरपालिकेने या योजनेसंदर्भात कार्यवाही स्थगित ठेवली आहे.

तथापि, उपरोक्त बाबींमुळे काही विलंब झाला असून या योजनंअंतर्गत पात्र लाभार्थ्यांचा विस्तृत प्रकल्प अहवाल बनविण्याकरीता शासन नियुक्त KPMG या संस्थेकडे अर्ज व इतर कागदपत्रे माहे, डिसेंबर २०२० मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेने पाठविले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धर्मादाय रुग्णालयांकडून गरीब रुग्णांसाठी आरक्षित खाटा ठेवणे बंधनकारक करण्याबाबत

**(४२) * २१८४८ श्रीमती श्वेता महाले (चिखली), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मादाय रूग्णालयामार्फत एकूण क्षमतेच्या १०% खाटा मोफत व १०% खाटा हया ५०% सवलतीच्या दरामध्ये गोरगरीब रूग्णांच्या उपचाराकरिता राखीव ठेवणे बंधनकारक असतांना देखील धर्मादाय रूग्णालयांकडुन त्याचे उल्लंघन होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरगरीब रूग्णांना धर्मादाय रूग्णालयांत या योजनेचा लाभ मिळवून देण्यास सहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेले वैद्यकिय समाज सेवक (MSW) संबंधित रूग्णालय प्रशासनाशी संगनमत करून गरजू रूग्णांना योग्य ती माहिती न देता त्यांचेकडुन अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून उक्त योजनेचा लाभ मिळण्यापासून रूग्णांना वंचित ठेवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आपत्कालिन परिस्थितीमध्ये रूग्णालयात उपचारासाठी येणा-या गोरगरीब रूग्णांना विहीत वेळेत वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी सर्व धर्मादाय रूग्णालयांतील रूग्ण सुविधा व तेथे नियुक्त वैद्यकिय समाज सेवक यांच्या सेवा २४ तास उपलब्ध होत नसल्याने रूग्णांना वैद्यकिय उपचारापासून वंचित रहावे लागत आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा गोरगरीब रूग्णांना विहीत वेळेत वैद्यकिय उपचार मिळण्यासाठी सर्व धर्मादाय रूग्णालयांतील रूग्ण सुविधा व तेथे नियुक्त वैद्यकिय समाज सेवक यांचे सेवापरीक्षण करणे गरजेचे असून त्यानुंषगाने शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) नाही.

राज्यातील धर्मादाय रुग्णालये महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ कक अंतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केलेल्या योजनेचे अनुपालन सर्वसाधारणपणे करतात. तथापि, काही धर्मादाय रुग्णालयांकडून मा. उच्च न्यायालयीन योजनेचे पालन होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय कार्यालयाकडून व देखरेख समितीकडून आवश्यक चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(२) नाही.

सर्वसाधारणपणे धर्मादाय रुग्णालयातील वैद्यकिय समाज सेवक (MSW) हे निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांच्या कागदपत्रांची छाननी करुन पात्र रुग्णांना सदर योजनेचा लाभ देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करतात. तथापि, यासंदर्भात काही तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीच्या अनुषंगाने धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून आवश्यक कार्यवाही केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे स्मार्ट सिटी कंपनीने शहरात केलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(४३) * २१०११ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील स्मार्ट सिटी कंपनीने शहरात केलेल्या कामांचा दर्जा निकृष्ट असून सदर कामे नियमबाह्य पद्धतीने सुरु असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाची नियमबाह्य कामे करणाऱ्या स्मार्ट सिटी कंपनीच्या कामाचे लेखापरीक्षण देखील झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास झालेल्या स्मार्ट सिटी अॅडव्हायजरी फोरमच्या पाचव्या बैठकी दरम्यान मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी कंपनीच्या कामांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) • हे खरे नाही.
• पुणे स्मार्ट सिटीतर्फे करण्यात येणाऱ्या प्रत्येक कामाचे दर्जा परीक्षण स्मार्ट सिटीने नियुक्त केलेल्या शासन मान्यता प्राप्त संस्था सर्टीफिकेशन इंजिनिअर्स इंटरनॅशनल लि., मानकीकरण परीक्षण आणि गुणवत्ता प्रमाणन निर्देशानालय, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान,मुंबई मार्फत केले जाते.
(२) • हे खरे नाही.
• स्मार्ट सिटी कंपनीच्या कामाची गुणवत्ता तपासणी शासकीय मान्यताप्राप्त संस्था सर्टीफिकेशन इंजिनिअर्स इंटरनॅशनल लि., मानकीकरण परीक्षण आणि गुणवत्ता प्रमाणन निर्देशानालय, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई मार्फत करण्यात येते.
• तसेच दरवर्षी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून प्राधिकृत केलेल्या संस्थामार्फत अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षण करण्यात येते.
(३) • होय, हे खरे आहे.
• स्थापत्य कामांची फेर तपासणी पुणे स्मार्ट सिटीने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या त्रयस्त संस्थेमार्फत करण्याची सुचना करण्यात आली होती.
(४) व (५) • पुणे स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाची मान्यता घेऊन केलेल्या कामांचे फेर परीक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे मार्फत करून घेण्यात येणार आहे.

----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये आरक्षित ठेवलेल्या विकास प्रकल्पाच्या जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत

**(४४) * २०३९४ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये आरक्षित ठेवलेल्या भूखंडापैकी सुमारे ८० टक्के म्हणजे २५०० पेक्षा अधीक भूखंडावर महानगरपालिकेच्या अधिका-यांच्या संगनमताने अनधिकृत टॉवर व चाळी उभारुन भूमाफीयांनी विकास प्रकल्पाच्या जागा हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षित भूखंडावर भूमाफीयांनी अधिका-यांच्या संगनमताने कब्जा करुन अनधिकृत चाळी तसेच टॉवर उभे केल्यामुळे महानगरपालिकेचे कोटयवधीचे नुकसान झाले असून विकास प्रकल्प राबविणेसुध्दा महानगरपालिकेला अडचणीचे होत असल्याने या विषयांवर महासभेत नगरसेवकांनी वारंवार चर्चा केली असून या प्रकरणी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे वारंवार तक्रारीही केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरक्षित भूखंडावर बांधकामास परवानगी देण्यास जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर विनाविलंब कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा ठरावही झालेला होता तसेच या प्रकरणी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, लाचलुचपत विभाग आदींकडे तक्रारीही करण्यात आलेल्या असतानाही संबंधित जबाबदार अधिका-यांविरोधात आजमितीस कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित जबाबदार अधिका-यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण १२१२ भूखंड आरक्षित असून त्यापैकी ५२९ भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत.

• सदर आरक्षित भूखंडावर अनधिकृत टॉवर व चाळी उभारून भूमाफियांनी विकास प्रकल्पाच्या जागा हस्तगत केल्या अशी वस्तुस्थिती नाही.

(२), (३) व (४) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात "प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी" अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०६ व २६७(१) अन्वये नोटीस काढून बांधकाम धारकास "अधिकृतता" दर्शविणारे कागदपत्र सादर करणेबाबत सुनावणी आयोजित करतात.

• सदरचे बांधकाम अनधिकृत असल्यास बांधकाम धारकास स्वखर्चाने सदर बांधकाम काढून टाकण्याची सूचना दिल्या जातात.

• सदरचे बांधकाम बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते.

• सन २०१५ ते २०२० अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत १०४५० अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत, तर ४१३ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केलेले आहेत.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## दक्षिण मुंबई मधील डोंगरी-माझगांव विभागातील हँकॉक पुलाची उंची वाढविल्यामुळे परिसरातील इमारती बाधीत झाल्याबाबत

**(४५) * २३३१५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील सॅण्डहर्स्ट रोड, डोंगरी आणि माझगांवला जोडणाऱ्या हँकॉक पुलाचे उभारणीचे काम सुरु असून सदर पूल पाडलेल्या ठिकाणी रेल्वे व महानगरपालिकेतर्फे माहे जून, २०२० मध्ये ठेवण्यात आलेल्या तयार लोखंडी पुलाची उंची जमीनीपासून सहा फूट उंच केल्याचे दिनांक ३० जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु पुलाची उंची जमीनीपासून ६ फूट उंच केल्यामुळे शिवदास चापशी मार्गावरील सात इमारती बाधीत होऊन त्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता सहाय्यक महानगरपालिका आयुक्त, ई वार्ड यांचेतर्फे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान बाधीत इमारतींना नोटीस बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सॅण्डहर्स्ट रोड शेजारील मस्जिद बंदर रेल्वे पुल एकही इमारत विस्थापित न करता तसेच पुलाची जमिनीपासून उंची न वाढविता बांधण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी रेल्वे आणि महानगरपालिकेच्या अभियंता, अधिकारी यांनी चुकीचे नियोजन केल्यामुळे हँकॉक पुलाची उंची वाढविणे व त्यामुळे सात इमारतीतील ३५० कुटुंब विस्थापित होणार असल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त हँकॉक पुलामुळे बाधित झालेल्या ७ इमारतीतील कुटुंबांचे जवळच्या जागेत पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सदर पुलाच्या बांधणीचे आराखडे रेल्वे प्राधिकरणाने मंजूर केले आहेत. रेल्वेने मंजूर केलेल्या आराखडयात  ट्रॅकपासून पुलाच्या तळाची ऊंची ५.५२५ मीटर एवढी दर्शविली आहे. त्यानुसार सदर पुलाचे गर्डरस् जागेवर ठेवण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सॅण्डहर्स्ट रोड शेजारील मस्जिद बंदर रेल्वे पुल रुंदी न वाढविता बांधण्यात आला आहे. त्यामुळे इमारत विस्थापित करण्याचा प्रश्न उद्भवला नाही, असे रेल्वे प्राधिकरणाने कळविले आहे.

(४) व (५) पुलाची उंची व शिवदास चापसी मार्गावरील इमारती बाधित होणे याचा कोणताही संबंध नाही. हँकॉक पुलाच्या आराखड्यामध्ये अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीनुसार पुलाचे पोहोच मार्गाचे प्रयोजन केले असल्यामुळे लगतच्या इमारती बाधीत होत नाहीत.

अस्तित्वात असलेला शिवदास चापसी मार्गाची मंजूर रस्तारेषा ३०.०० मीटर असल्याने भविष्यात रस्ता रुंदीकरणामुळे लगतच्या इमारती बाधीत होणार आहेत. परंतु याबाबत अद्याप कार्यवाही सुरु करण्यात आलेली नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या कफ परेड येथील सेंट्रल पार्क प्रकल्पाबाबत

**(४६) * २०३९५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने कफ परेड येथील ३०० एकरच्या सेंट्रल पार्कसाठी समुद्र आरक्षित केला असून सदर पार्क उभारताना समुद्रातील भरतीच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी गोव्याची समुद्र विज्ञान संस्था, राष्ट्रीय पर्यावरण अभीयांत्रिकी संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समुद्रातील सर्वेक्षणाला सन २०१८ मध्ये कफ परेड कोळीवाडयातील कोळी बांधवांनी विरोध दर्शविला होता व त्यानंतर सदर सर्वेक्षण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार सदर प्रलंबित असलेला प्रकल्प उभारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी कफ परेड येथील कोळीवाड्यातील कोळी बांधवांशी चर्चा करण्याकरिता प्राथमिक स्तरावरील महानगरपालिका अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून, त्याप्रमाणे कोळी बांधवांशी संपर्क करण्याकरिता प्रस्तावित असल्याचे बृहन्मुंबई महागनरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचपोकळी (मुंबई ) येथील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाबाबत

**(४७) * २३३१८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचपोकळी (मुंबई) येथील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकास प्रकल्पात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे २३७६ चौ.मी. बांधकाम हस्तांतरीत न करता विकासकास बेकायदा हस्तांतरीत करून सुमारे ३२ कोटी रुपयांचा लाभ विकासकास मिळवून देऊन म्हाडाचे नुकसान केल्याचा आक्षेप महालेखाकार यांनी शासनास माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान सादर केलेल्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात प्रत्यक्षात पुनर्वसन करावयाच्या १९९ भाडेकरु रहिवाशी कुटुंबापैकी अद्याप १०४ कुटुंबाचे पुनर्वसन केले नसुन विकासकाने मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाला स्वाधीन करावयाच्या ३५९६ चौ.मी. अधिकच्या क्षेत्रफळापैकी १२२० चौ.मी. क्षेत्रफळ माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान विकासकास हस्तांतरीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व त्यानुसार मंडळाचे विकासकास २३७६ चौ.मी. बेकायदा हस्तांतरीत केलेले बांधकाम पुन्हा मंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच विकासकांवर व संबंधित दोषी अधिकारी यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय हे अंशत: खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अहवालानुसार, भारताचे नियंत्रक व लेखापाल (कॅग) यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने चिंचपोकळी (मुंबई) येथील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकास योजनेमध्ये ३५९५.६५ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द करणे विकासकाला बंधनकारक असून यापैकी विकासकाने आजपर्यंत १२२०.६९ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास सुपूर्द केले आहे. उर्वरित २३७४.९६ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ हे या योजनेमधील विक्रीसाठी राखीव असलेल्या इमारत क्र.४ मध्ये उपलब्ध होणार आहे, ही बाब मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने भारताचे नियंत्रक व लेखापाल (कॅग) यांना कळविली असून त्यांना सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती केली आहे.

(२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार, भुकर पाहणी क्रमांक १ए/७८२, २/७८३, ७८३, ७८४, ७८५ आणि ७८६ माझगांव विभाग या मिळकतीच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र धारकांने एकूण ०५ इमारती प्रस्तावित केल्या असून, यापैकी ०३ इमारती (इमारत क्र.१, २ व ३) या मुळ भाडेकरु/रहिवाशी यांच्या पुनर्वसनासाठी राखीव आहेत. दोन इमारती (इमारत क्र.४ व ५) या विक्रीसाठी आहेत.

ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने पुनर्वसनाच्या इमारत क्र.१, २ व ३ यांचे बांधकाम पुर्ण केले असून त्यामध्ये योजनेमधील सर्व १९९ भाडेकरु/रहिवाशी यांचे पुनर्वसनाकरिता गाळे उपलब्ध केले आहे. भुखंडावर असलेल्या असहकार्य करणाऱ्या गोडाऊन धारकांने गोडाऊन रिक्त करुन, स्थलांतरीत होण्यास विरोध केल्यामुळे इमारत क्र.४ (विक्रीकरिता असलेल्या) चे बांधकाम ना-हरकत प्रमाणपत्रधारकांस अद्यापही सुरु करता आलेले नाही. सदर गोडाऊन धारकाविरुध्द म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम ९५(अ) अंतर्गत कार्यवाही मंडळाकडून सुरु करण्यात आलेली आहे.

योजनेमध्ये इमारत क्र.४ व ५ या विक्रीसाठी नियोजित असून, या दोन्ही इमारतींचे २३९७१.२९ चौ.मी. विक्रीसाठी उपलब्ध होणाऱ्या क्षेत्रफळापैकी १०७८२.६१ चौ.मी. क्षेत्रफळ विकासकाने बांधले होते. त्यापैकी समप्रमाणात १२२०.६९ चौ.मी. क्षेत्रफळ अंशत: अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हणून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द करण्यात आलेले आहे. उर्वरित २३७४.९६ चौ.मी. क्षेत्रफळ हे विकासकाने विक्रीसाठी राखीव इमारत क्र.४ मध्ये उपलब्ध होणार आहे. सदर २३७४.९६ चौ.मी. क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द केल्याशिवाय इमारत क्र.४ च्या भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकाडून दिले जाणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.